# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११५**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष आठवे / अंक ४ / मार्च २००७

## संपादकीय

### शिक्षण - चिंता आणि चिंतन

स्वातंत्र्योत्तर कालखंडाची सहा दशके संपत आली आहेत. या सहा दशकांत शिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग झाले; परंतु अनेक मूलभूत प्रश्न अद्यापही अनुत्तरितच आहेत. या प्रश्नांवरील तोडगे सर्वांना माहीत असतात, परंतु प्रश्न भिजत ठेवण्यातच हित असणाऱ्या संबंधितांची मानसिकता निर्णायक तोडगे काढण्यापासून त्यांना परावृत्त करते.

लॉर्ड मेकॉलेच्या कारकून बनवणाऱ्या शिक्षणपद्धतीत सर्वांनाच बदल हवा असल्याने स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. राधाकृष्णन समिती, मुदलियार समिती, कोठारी आयोग, नवीन शैक्षणिक धोरण इ. काही प्रयत्न झाले; नाही असे नाही. या सर्व प्रयत्नांशी संबंधित व्यक्तींची तज्ज्ञता, त्यांचे हेतू हेदेखील प्रामाणिकच होते. परंतु या सर्व वाटचालीत शिक्षणाच्या रचनेत बदल होत गेले, आशय मात्र बदलला नाही. नाही म्हणायला, जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे काही बाबतीत आमूलाग्र बदलणे आवश्यक बनायला लागले आहे, पण मूळ भारतीय शिक्षण पद्धतीत अपेक्षित असणारा स्वयं संशोधनाचा आशय, जीवनाभिमुखता आणण्याची मानसिकता अद्यापही नाही.

जे. कृष्णमूर्तींचे याबाबतचे विचार फार स्पष्ट आहेत. आतून बाहेर येणे, विकसित होणे म्हणजे शिक्षणप्रक्रिया अशा शब्दांत थोडक्यात तो सांगता येईल. या सर्व शिक्षण तज्ज्ञ व शिक्षण चिंतकांनी शिक्षण व्यवसायाभिमुख, जीवनोन्मुख असण्याची गरज स्पष्ट केली आहे. अशा जीवन स्पर्शित्वाचा अर्थ समजावून घ्यावयाचा असेल तर काळाचा संदर्भ न सोडता ग्रंथांच्या माध्यमातून नवीन जीवनोनुखतेच्या दिशा जाणून घ्याव्या लागतील.

ज्ञान पुस्तकी नसावे, हे खरे असले तरी जीवनाचे ज्ञान पुस्तकांतूनच जाणून घ्यायला हवे. पुस्तकाची जागा ही स्वतंत्र आहे आणि इंटरनेट हे माध्यम वेगळे आहे. ग्रंथात ज्ञानाचा शोध घेताना अनेक दिशा स्पष्ट होत जातात. दुर्दैवाने शिक्षण क्षेत्राशी संबंधित राज्य व राष्ट्रव्यापी निर्णय घेणाऱ्या यंत्रणा या सर्वांपासून दूर आहेत, तसेच राहू इच्छित आहेत. 'शिक्षणाचा व्यापार झाला' अशी ओरड करणारे कितीही ओरड करोत, जीवनापयोगी शिक्षणाचे प्रत्यक्ष पाठ घ्यायला जगातल्या प्रख्यात संस्था विपणनाच्या हेतूनेच जग जिंकायला निघाल्या आहेत.

(पान क्रमांक ४०)




वर्ष आठवे / अंक ४ / मार्च २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री अरविंदानी उराशी बाळगलेली स्वप्ने | शं.बा.मठ | ३ |
| २) | युगकर्ती - डॉ. मारिया मॉटेसरी | विशाखा देशपांडे | ७ |
| ३) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | १० |
| ४) | देह त्यागिता | सौ. मालती देवधर | १७ |
| ५) | गीताई नीति कथा (भाग ३ रा) - शिवाजीराव भावे | आशा भिडे | १९ |
| ६) | होय मी वाचन करतो ! | एम्. एन् म्हात्रे | २१ |
| ७) | शिक्षण - एक चिंतन | दत्तात्रय गुरव | २४ |
| ८) | शालेय शिक्षण - व्याख्यांच्या संदर्भात | मोहन पाठक | २९ |
| ९) | परिसर वार्ता | | ३३ |
| १०) | रवीन्द्र मनन : एक अंतर्मुख अनुभव ! | मोहन पाठक | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री अरविंदानी उराशी बाळगलेली स्वप्ने

## (लेखांक पाचवा)

*योगी अरविंद यांच्या चरित्राचा पुढील भाग येथे देत आहोत - संपादक*

**श्री अरविंदांनी उराशी बाळगलेली स्वप्ने -**

**पहिले स्वप्न-** भारतीय स्वातंत्र्य आणि भारतीय ऐक्य मिळवून देणारे क्रांतिकारक आंदोलन. आज भारत स्वतंत्र झाला आहे. परंतु त्याने एकत्व प्राप्त केलेले नाही. पूर्वीचा हिंदुमुसलमान जातीय भेद इतका दृढ झाला आहे की जणू काही ते राजकीय दृष्ट्या देशाचे दोन कायमचे भाग होऊन राहिले आहेत. ते म्हणतात- विभाजन फार काळ टिकता कामा नये. त्यामुळे भारत दुर्बळ होईल. नेहमी कलह होतील. परकीय आक्रमणाला अवकाश मिळेल. अंतर्गत विकास खुंटेल. विभाजन नष्ट झालेच पाहिजे. एकत्व प्राप्त झालेच पाहिजे. व ते होईलच.भारताच्या उज्ज्वलतेसाठी ते आवश्यक आहे.

**दुसरे स्वप्न-** मानव संस्कृतीच्या प्रगतीच्या कार्यात स्वीकारलेली जबाबदारी पुन: स्वीकारण्यासाठी आशियाचे पुनरुत्थान व बंध विमोचन, भारताला यातील काही वाटा उचलावयाचा आहे. व हे कार्य जोमाने व कर्तबगारीने केले पाहिजे. ते आज सुरू झाले आहे. त्याच्या मधे काय संभाव्यता आहेत आणि राष्ट्रमंडळामधे भारत कोणते स्थान घेऊ शकेल हे दिग्दर्शित केले जात आहे.

**तिसरे स्वप्न-** अखिल मानव जातीसाठी विशालतर उज्ज्वलतर आणि उदात्त जीवन विकास पावण्यासाठी एक बाह्य परिस्थिती म्हणून जगाचे एकीकरण - मानवजातीचे एकीकरण आज मार्गावर आहे. त्यामध्ये भारताने एक महत्वपूर्ण भूमिका घेण्यास प्रारंभ केला आहे. एकत्वाची एक नवीन भावना मानवजातीच्या मनाचा कबजा घेईल.

**आणखी एक स्वप्न -** भारताची जगाला आध्यात्मिक देणगी. ते आधीच सुरु झाले आहे. अनेक दुर्घटना घडत असतानाही भारताकडे अधिकाधिक लोकांचे डोळे आशेने लागून राहिले आहेत. भारताच्या केवळ शिकवणीचाच नव्हे तर त्याच्या अंतरात्मिक आणि आध्यात्मिक प्रत्यक्ष साधन मार्गाचाही आश्रय वाढत्या प्रमाणात घेतला जाऊ लागला आहे.

**शेवटचे स्वप्न-** मानवाला उच्चतर आणि विशालतर चेतनेप्रत उचलून नेऊ शकेल अशी विकास क्रमातील पुढची पायरी चढणे. आत्मविश्वासाने ही उत्क्रांन्ती सुरु होणार असल्याने तेथेही भारताने आद्य प्रेरणा दिली पाहिजे. भारताच्या मुक्तता दिनामधे हा सर्व आशय मी पाहत आहे.

**काव्य लेखन -**

श्री अरविंद एकदा म्हणाले - 'मी कवी आणि राजकारणी होतो. तत्त्वज्ञानी नव्हतो. तरीही श्री अरविंद संपूर्ण जगाला ते प्रथमत: योगी आणि तत्त्वज्ञानी म्हणूनच ज्ञात आहेत. भारतीय इतिहास या विषयाचे विद्यार्थी त्यांना राजकारणी म्हणून ओळखतात. आणि फारच थोडक्यांना ते कवी म्हणून माहीत आहेत.'

श्री अरविंद चरित्रावरुन प्रथम राजकीय नंतर योगी व तत्त्वज्ञानी असेच ओळखले जातात. त्यानी इंग्लंडमध्ये तसेच बडोद्यात असताना थोडे काव्यलेखन केले. परंतु ते महान् कवी व मोठे काव्यलेखन करू शकणारे आहेत हे उशीरा ध्यानात येते. त्यांचे भव्य उदात्त काव्य 'सावित्री'

हे आहे. श्री अरविंदानी जन्मभर अगदी शेवटपर्यंत काव्य लेखन केले. त्यांचे भावपूर्ण काव्य अत्यंत सुंदर आहे. त्यात त्यांच्या सूक्ष्म दृष्टीचा अनुभव स्पर्श दृष्टीस पडतो. बडोद्यात त्यांनी प्रदीर्घ वर्णनात्मक काव्ये लिहिली 'प्रेम आणि मृत्यू', 'उर्वशी'. त्यांनी अनेक काव्यात्मक नाटकेही लिहिली, प्रेमाच्या मृत्युवरील विजय, हा जो त्यांच्या काव्याचा त्याकाळचा विषय होता, तोच निराळ्या पातळीवर 'सावित्री' काव्याचा विषय आहे. त्यांच्या राजकीय काळात त्यांनी पुष्कळ कविता व नाटके लिहिली ती काही राजकीय वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. बाजी प्रभूची, महान रणशूराची, शिवाजीच्या वीर कथा, त्याच निर्भय धैर्य, उदात्त स्वार्थत्याग या विषयीचे काव्य सर्वांनाच वाचनीय आहे. बाजीप्रभूला हे माहीत होते की भगवंताकडूनच मनुष्याला सर्व शक्तीचा साठा मिळत असतो. सर्वात उत्तम काव्य पाँडिचेरीतील वास्तव्यातील आहे तत्त्वज्ञान लिखाणाविषयी श्री अरविंद म्हणतात.

'मी जेजे काही लिहिले ते सर्व योगिक अनुभूती ज्ञान आणि स्फूर्ती यातून स्त्रवले. त्याचप्रमाणे माझे काव्यावरील प्रभुत्व आणि निर्दोष शब्दरचना ही मी माझी चेतना उंचावून प्राप्त करून घेतली.' अत्यंत मनोरम भावकाव्ये, अत्यंत प्रभावी सुनीते, आश्चर्यजनक वीररस प्रधान षट्पदी बद्ध काव्य, विशिष्ट मात्राबध्द आणि नवीन छंदोबद्ध वर्णनात्मक आणि भावात्मक काव्य या सर्वांनी हा काळ भरगच्च भरला आहे. आणि ती बहुतेक सर्वच काव्य, गूढ आध्यात्मिक, अनुभवांनी बहरलेली आहेत.

**'सावित्री'**

काव्याचा मुकुटमणी, अद्भुत महाकाव्य 'सावित्री'. २३,८०० ओळीहून अधिक ओळींचे हे महाकाव्य. वर्षानुवर्षे ते त्यांनी अनेकदा लिहिले, त्याला पुन:उजाळा दिला. पूर्णत्व दिले, त्यांचे सत्याचे विशाल दर्शन विश्वाचे आणि जीवनाचे आध्यात्मिक दर्शन. जेव्हा जग अव्यक्त भगवंताची अभिव्यक्ती होईल त्यावेळचे भविष्यकाळचे दर्शन मूर्तिमंत केले. त्यांचे सर्व अध्यात्मिक ज्ञान भांडार त्यात आहे. अस्तित्वाच्या सर्व पातळ्यांचे घनांध:कारयुक्त गर्तेपासून ते सर्वोच्च शिखरापर्यंत, दिव्य सत्याच्या दैदीप्यमान जगतापर्यंतचे आंतरिक ज्ञान आणि अनुभूती त्यात आहे. 'वैश्विक गूढांचा कवी' असे त्यांच्याच भाषेत आपण म्हणू शकू.

सावित्री ही एक कथा आणि रुपक आहे. महाभारतातील आख्यायिकेवर आधारलेल्या या कथेत सावित्रीला दिव्य वाणी, सूर्यकन्यका, सर्वोच्चसहा देवता असे म्हटले आहे. ती सत्यवानाला मृत्यूच्या मगर मिठीत आणि अज्ञानात उतरलेल्या आत्म्याला, वाचविण्यासाठी खाली उतरली, असे सांगितले आहे. श्री अरविंदच्या काव्यात दिव्य मातेचा अवतार असलेली सावित्री परमप्रभूला हा शेवटचा वर मागते:-

"दु:खाची जिवंत गाठ विदारणारे तुझे आलिंगन, हे प्रभो ज्या मधे सारे प्राणिमात्र श्वसन करतील, असा तुझा आनंद, गाढ गूढ प्रेमाचे जादुमय निर्झर, आणि तुझे माधुर्य पृथ्वीसाठी आणि मानवासाठी मला प्रदान कर."

तिने असे वचन मिळवले की जेव्हा तिचे संपूर्ण कार्य समाप्त होईल, तेव्हा एक नवीन शक्ती मानवात उदय पावेल. सनातनाचे सत्य त्याच्या आचार विचारांना आकार देईल, मार्गदर्शक ठरेल, सारे काही बदलून जाईल, दिव्य सुसंवाद पृथ्वीचा नियम होईल. सौंदर्य आणि आमोद तिचा जीवनमार्ग घडवतील, निगूढ देवाला अभिव्यक्त करण्यासाठी प्रकृतीचे जीवन असेल. हे पार्थिव जीवन दिव्य जीवन बनेल.

**माताजी श्री अरविंदाच्या काव्या विषयी म्हणतात:-**

त्यांचे सत्याविष्करण भविष्यसूचक आहे. ते

उत्स्फूर्त प्रासादिक काव्य आहे. त्यांची भाषा अपरिवर्तनीय मंत्रवाणी आहे. वर्षानुवर्षे श्री अरविंद सावित्रीचे काम करीत होते. पुन:पुन: बदल करीत होते. कायम वाढवीत होते. त्याला परिपूर्ण करीत होते. १९५० सप्टेंबर मध्ये त्यांनी आपल्या लेखकू शिष्याला सांगितले. मला सावित्री लवकर संपविली पाहिजे. नेहमी धिमेपणाने काम करणाऱ्या व्यक्तीच्या तोंडी हे वाक्य त्याला अत्यंत अनोळखी वाटले.

**महासमाधी-**

५ डिसेंबर १९५० रोजी या विचित्र शब्दाचा अर्थ उमजला. या दिवशी मध्यरात्रीनंतर श्री अरविंदांनी देह सोडला. त्यांनी याविषयी आधीच निर्णय घेतला होता, हे तर निश्चितच! कारण महान् योग्याप्रमाणे ते मृत्यूचे स्वामी होते. या घटनेविषयी माताजी म्हणतात-

आपल्या गुरुने केवळ आपल्या सर्वांकरताच स्वत:चा सर्वस्वी त्याग केला आहे. त्यांनी इतक्या उदात्त कारणासाठी देह सोडण्याचे पसंत केले, की ते समजणे मानवी मनाच्या आवाक्याबाहेरचे आहे. त्यांनी स्वत:च सावित्री मध्ये याचे स्पष्टीकरण दिलेले दिसते.

असत्य सागराच्या पैलतीरी त्याला नेलेच पाहिजे. चिरकालीन रात्रीमधे प्रकाश आणण्यासाठी त्याने त्यात प्रवेश केलाच पाहिजे. चिरकालीन रात्रीमधे त्यांनी शिरलेच पाहिजे आणि देवाचा अंध:कार जाणला पाहिजे जसा त्याचा प्रकाश सूर्यही जाणतो. यासाठी त्याने गर्तेमध्ये, गेले पाहिजे. शोकभय विराट प्रवेशावर आक्रमण केले पाहिजे. तेव्हाच येथील दु:खाचा कायदा संपुष्टात येईल.

त्यांचा तेज:पुंज देह चिरनिद्रेत विसावला होता. हजारो लोकांनी त्यांचे अत्यंदर्शन घेतले. चार दिवसांपेक्षाही जास्तवेळ ठेवूनही देहात काही बदल झालेला नव्हता. माताजी याबद्दल म्हणतात- एकीभूत, धन, आणि मानसिक प्रकाशाने त्यांचा देह भारलेला होता. ९ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता आश्रमाच्या आवारात तयार केलेल्या समाधीत त्यांचा देह ठेवण्यात आला.

७ डिसेंबरला माताजी म्हणाल्या- प्रभो तू मला असे आश्वासन दिले आहेस की, तुझे दिव्य कार्य साध्य होईपर्यंत, पृथ्वीचे परिवर्तन होईपर्यंत तू आमच्या बरोबर राहाशील, कृतज्ञता व धन्यवाद व्यक्त करणारी एक सुंदर प्रार्थनाही श्री माताजींनी लिहिली ती श्री अरविंदांच्या समाधीवर कोरलेली आहे.

जगाच्या इतिहासात श्री अरविंद ज्याचे प्रतिनिधित्व करतात ती एखादी शिकवण किंवा एखादा नव साक्षात्कारही नाही. तर प्रत्यक्ष परमेश्वराची ती एक निर्णायककृती आहे, असे माताजी म्हणतात.

**आश्रम -**

श्री अरविंदाचे कार्य चालू आहे. नित्य निरंतर अधिकाधिक व्यापक आणि समृद्ध होत आहे. श्री माताजी या त्याच्या स्फूर्तिदायक संचालिका आणि मार्गदर्शिका आहेत. केवळ २४ साधकांनिशी १९२६ साली आश्रमाची स्थापना झाली. इतक्या वर्षाच्या अवधीत तो महान संस्थेत परिणत झाला आहे. हे पाहिले म्हणजे त्याच्या पाठीमागील शक्तीची आपणांस काहीशी कल्पना येईल. सर्व प्रकारचे, सर्व संप्रदायाचे विविध राष्ट्रीयत्वाचे, सर्व सामाजिक थराचे जगातील सर्व ठिकाणाचे आबालवृद्ध मुमुक्षू आणि साधक आश्रमात आहेत. श्री अरविंदानी एकदा म्हटले होते की आश्रम ही एक विराट प्रयोगशाळा आहे. हे असे एक प्रयोगक्षेत्र आहे, ज्या ठिकाणी मानवी स्वभावाच्या सर्व मूलभूत अडचणीना, मानवी जीवनाच्या सर्व समस्यांना तोंड देऊन जिंकले जाते. येथे प्रत्येक प्रकारचे काम केले जाते. सर्व प्रकारचे व्यवसाय हाती घेतले जातात. कारण कोणतेही कार्य असो, ते भगवंताला अर्पिले जाते. तेव्हा ते आत्मशोधाचे, आत्मसाक्षात्काराचे आत्मसत्याशी

एकरूप होण्याचे आत्म्याच्या सर्वांगीण परिपूर्ण जीवन प्राप्तीचे साधन बनते.

**श्री अरविंद म्हणतात-** सर्वोच्च सत्य जाणणे आणि त्याच्याशी सुसंवादी होणे ही यथार्थ अस्तित्वाची अट आहे. आणि आपल्या सर्वांगात ती प्रगट करणे, त्याची अनुभूती घेणे त्याचा आचार करणेही यथार्थ जीवनाची अट आहे.

### आंतरराष्ट्रीय शिक्षणकेन्द्र

श्री अरविंदांचे अत्यंत प्रिय उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने माताजींनी १९५१ साली श्री अरविंद आंतरराष्ट्रीय विद्यापीठ केन्द्र स्थापन केले, त्यावेळी त्यांनी असे जाहिर केले-

अशा प्रकारचे केन्द्र स्थापन करणे म्हणजे अतिमानस प्रकाशाचा स्वीकार करण्यास भविष्यकालीन मानव जातीला तयार करण्याचे एक उत्तम साधन होय. हा अतिमानस प्रकाश आजच्या मानव जातीला वेचक व्यक्तींचे परिवर्तन करुन त्याचे अशा एका मानव वंशात रूपांतर करील की, जो मानव वंशभूतलावर एक नूतन प्रकाश नूतन शक्ती आणि नूतन जीवन यांचा अविष्कार घडवून आणील. जगातील निरनिराळया ठिकाणचे शेकडो विद्यार्थी येथे शिकत आहेत. आपली स्वत:ची प्रगती करुन मानवतेच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकत्वास एक वळण देत आहेत. एका नव्या जगाचा पाया निर्माण करत आहेत.

### आटोविल - उषानगरी

या नूतन सृष्टीची नूतन जगताची मुहूर्तमेढ म्हणून कित्येक वर्षापूर्वी श्री माताजींनी एकतेचे आणि विश्व बंधुत्वाचे प्रतीक असलेल्या एका आदर्श वसाहतीचे एक स्वप्न रंगतिले होते १२-२-१९६८ या दिवशी त्यांनी या नूतन नगरीचे ओटोविल-उषानगरीचे श्री अरविंद नगरीचे उद्‌घाटन केले. पायाभरणी करताना सर्व देशाची माती, आश्रमाची माती आणि उषानगरीची माती मिसळलेली आहे. या नगरात राहणारा मनुष्य हा दिव्य चेतनेचा स्वयंसेवक असला पाहिजे. श्री अरविंदांच्या शक्तीचे आणि विश्वदर्शनाचे हे केवळ प्रकाश वितरक केंद्र आहे. श्री अरविंदांच्या योगाची शिकवण आणि शिक्षण देण्यासाठी जगभर अनेक केंद्रे उघडली गेली आहेत. चैतन्य शक्तीचे नवीन युग पृथ्वीवर उदय पावत आहे. हा भारताचा पुनर्जन्म आहे. जगाच्या इतिहासात श्री अरविंद ज्यांचे प्रतिनिधित्व करतात अशा परमेश्वराची, प्रत्यक्ष देवाची ही निर्णायक कृती आहे. श्री अरविंद म्हणतात- तुझ्या आत्म्याच्या आधारासाठी, परमेश्वर शक्तीवर अवलंबून रहा, उच्च सत्याप्रत दृष्टी वळव, प्रेम आणि शांती यांची आस धर.

**- श्री. शं.बा.मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

<u>दिशा</u>

**प्रकाशनास होत असलेल्या विलंबनामुळे आम्ही दिलगीर आहोत.**

- संपादक

# युगकर्ती - डॉ. मारिया मॉटेसरी

*युगकर्त्या या शब्दात ज्यांचे यथार्थ वर्णन करता येईल त्या मारिया मॉटेसरी यांच्या बालशिक्षणाच्या कामाला यंदा शंभर वर्षे झाली. त्यानिमित्ताने हा विशेष लेख- संपादक*

शिक्षण क्षेत्राशी निगडित असणाऱ्या कोणालाही मादाम मारिया मॉटेसरी हे नाव माहीत नाही असे होणेच शक्य नाही. बालकेंद्री शिक्षणप्रणालीचा पाया घालून संपूर्ण जगातील शिक्षणपद्धतीमधे इतिहास घडवून आणणाऱ्या या महान शिक्षण तज्ज्ञाच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे. सहा जानेवारी १९०७ साली मॉटेसरींची पहिली बालशाळा 'कासा दी बांबिनी' इटलीमधील सान लोरेंझो येथे सुरू झाली. या वर्षी सहा जानेवारी२००७ रोजी या बाल शाळेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने, त्यांनी सुरू केलेल्या बालशिक्षणाच्या नवयुगाला व शैक्षणिक क्षेत्रात तळपत असलेल्या कार्याला कृतज्ञतापूर्वक सलाम करण्याची संधी, आपल्या बालशिक्षण प्रेमींना चालून आली आहे. हे वर्ष, त्यांच्या या कार्याला समर्पित करून त्याच धर्तीवर बालशिक्षणाचे या पुढील कार्यही तडीस नेण्यास आपण सज्ज होऊ या!

डॉ. मॉटेसोरी या मूळच्या इटलीच्या, रोमजवळ चिराव्हली नावाच्या गावी, ३१ ऑगस्ट १८७० रोजी त्यांचा जन्म झाला. इटलीमध्ये वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया या विषयांत पदवी प्राप्त करणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. मनोविकृत मुलांच्या शिक्षण क्षेत्रात त्या अग्रगामी होत्या. डॉ. मॉटेसोरींनी त्यांच्या कार्याची सुरुवात रोम मधील गरीब वस्तीतील चाळीत केली. त्याचे असे झाले, रोमच्या कॉर्पोरेशनने कामगारांसाठी नव्या कोऱ्या चाळी बांधल्या. या वस्तीतील कामगार स्त्री-पुरुष कामावर गेले की घरी मुले एकटीच रहात व सर्वत्र घाण करून नव्या कोऱ्या भिंती, इमारती खराब करीत, तेव्हा कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी नवीन बाल शिक्षण पद्धती घेऊन आलेल्या मॉटेसरींना या मुलांसाठी शाळा सुरू करण्याची विनंती केली. बाईंनी मंदबुद्धी मुलांवर केलेले शिक्षणाचे नवे प्रयोग साधारण बुद्धीच्या मुलांवर करून पहायचे होते. ही चांगली संधी होती, कामगारांची मुले मंदबुद्धी किंवा कोणत्याही रीतीने मागास नव्हती. या मुलांना घेऊन त्यांनी ही 'कासी दी बांबिनी' सुरू केली. पुढे या शाळेचे पुष्कळसे अनुभव त्यांनी 'Montessory Method' (१९१२) या त्यांच्या जगभर प्रसिद्ध असलेल्या ग्रंथामध्ये नमूद केले आहेत. हे अनुभवही अतिशय बोलके आहेत.

शास्त्रीय बालशिक्षणाचे पहिले व मूलभूत सूत्र म्हणजे 'बालस्वातंत्र्य'. स्वातंत्र्याच्या वातावरणातच बालकाला आपल्या उपजत प्रतिभेने स्वशिक्षण करता येते, हे एक चिरंतन सत्य डॉ. मॉटेसोरींनी मांडले. त्यांच्या दृष्टीने जेथे बालकाला मर्यादित व साधे वातावरण मिळते ते त्यांच्या विकासाठी प्रेरक ठरते. ज्या वातावरणात प्रौढांच्या क्रिया स्वाभाविकपणे बघायला मिळतात ते वातावरण बालकांना जास्त पसंत असते. स्वावलंबनाची वृत्ती हा त्याच्या पद्धतीचा मूलाधार आहे. बालकाला जरूर नसेल अशी मदत करणे म्हणजे त्यांच्या विकास कार्यात व्यत्यय आणण्यासारखे आहे. शिक्षिकेची भूमिका साहाय्यकाची समजली जाते. परंतु साह्य-साह्यातील सूक्ष्म फरक असा आहे, की ज्यामुळे बालक अधिकाधिक परावलंबी व दुर्बल बनते, व दुसऱ्या साह्याचे स्वरूप असे की त्यामुळे बालकाचा आत्मविश्वास, उत्साह आणि स्वावलंबनाची वृत्ती विकसते. या दृष्टीने बालकाला कोणत्याही प्रकारच्या

मानसिक दडपणाखाली ठेवण्यास बालकाची ही नैसर्गिक स्वयंविकासाची प्रेरणाच नाहीशी होण्याचा धोका असतो. मॉटेसरी बाईच्या म्हणण्याप्रमाणे बालकाला वर्गाचे व शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. शिक्षकाची उग्र नजर, हातातील छडी, शाळेची शिस्त, धाक, शिक्षा या गोष्टी शालेय वातावरण भयभीत करून सोडत असतात. अशा शिक्षककेंद्री शिक्षणातून बालकाचे विकसनशील स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते. बालकाची स्वयंफूर्ती आक्रसते. बालकाच्या स्वावलंबी क्रियाशीलतेला दडपून टाकले जाते आणि एकूणच बालकाची स्वयंविकासाची निसर्गदत्त प्रेरणाच दूषित होते. ज्ञानेंद्रियाच्या द्वारा मूल आपला बुद्धीविकास घडविते हे ओळखून त्यांनी ज्ञानेंद्रीय शिक्षणाची साधने शोधून काढली. ज्ञानेंद्रिय शिक्षणाच्या बाबतीत मॉटेसरी बाई म्हणतात, 'ज्ञानेंद्रिय शिक्षणाने व्यक्ती निरीक्षक बनतात. त्यामुळे संस्कृतीच्या प्रचलित युगाशी त्यांचे सामान्य संयोजनाचे कार्य चांगले होते. एवढेच नव्हे तर व्यवहारिक जीवनाची तयारी त्यामुळे प्रत्यक्षपणे होते."

ज्ञानेंद्रिय शिक्षणातील साधने विकसित करताना आपल्या व्याख्यानांमध्ये मॅडम म्हणतात -"What we call education of the senses is in reality a help to the construction of intelligence." "This Possibility must be senses is in reality a help to the construction of the intelligence and so, we give to the children these objects which might be called by us Materialised Abstractions."

या साधनांच्या उपयोगितेबद्दल एका ठिकाणी मॅडम म्हणतात," तीन ते सात हाच बुद्धीशी संबंधित अशा इंद्रिय क्रियांच्या घडणीला काल आहे. यातच बालकांच्या ज्ञानेंद्रियांचा विकास होतो."

१९३९ साली दुसऱ्या महायुद्धामुळे जागतिक स्तरावरील दुर्घटनेस सुरुवात झाली. याच काळात त्यांना इटलीमधून परांगदा व्हावे लागले व त्या भारतात आल्या. भारतामध्ये त्यांचे सुमारे १०-१२ वर्षे वास्तव्य होते. बालशिक्षण विषयक व्याख्याने देणे, ठिकठिकाणच्या बालशाळांना भेटी देणे, प्रशिक्षण वर्ग चालवणे व आपल्या शिक्षण विषयक विचारांच्या प्रसारासाठी लेखन करणे असे त्यांचे कार्य त्यांनी सातत्याने चालू ठेवले. भारताने कृतज्ञ रहावे असे त्यांचे भारतातील कार्य आहे. भारतामध्ये सरलादेवी साराभाई, गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक ही सर्व मंडळी मॉटेसरी बाईच्या विचारांनी प्रभावीत होऊनच बालशिक्षणाच्या कार्यात उतरलेली होती. या सर्वांनी बाईच्या बालशिक्षण चळवळीच्या धर्तीवरच भारतातील बालशिक्षणाची चळवळ उभी केली होती. ही एक कार्यकर्त्यांची आणि विचारवंताची पिढीच त्यांनी प्रशिक्षित केली. त्या काळात लोकांना मॉटेसरीनेच्या तत्त्वज्ञानाचे इतके आर्कषण होते की त्याच्या प्रचारासाठी या देशातील लोकांनी एक आंदोलन निर्माण केले. हे उभे करण्यामध्ये भावनगर मधील "श्री दक्षिणामूर्ती" संस्थेचे श्री. गिजुभाई बधेका यांचा सिंहाचा वाटा होता. किंबहुना मॉटेसरी विचारांचा भारत व्यापी प्रचार करण्याचे कार्य त्यांनीच केले.

महाराष्ट्रातील पूर्व प्राथमिक शिक्षणाची चळवळ ही सौराष्ट्रातून आलेल्या ताराबाई मोडक यांनी चालू ठेवली. मॉटेसरी विचारांच्या महाराष्ट्रव्यापी प्रचाराचे श्रेय पूर्वीचा 'मॉटेसरी संघ' म्हणजे आताचा नूतन बालशिक्षण संघाला द्यावे लागेल. या संघाच्या वतीने श्रीमती ताराबाईंनी महाराष्ट्रातील पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पायाच घालून दिला. महाराष्ट्रामध्ये मॉटेसरींचा विचार जितका रुजला तितका त्यांच्या मायदेशातही रूजला नाही. त्यामुळे मादाम मॉटेसरींनी भारताला, विशेषतः गुजरात - महाराष्ट्राला आपले कायमचे ऋणी करून ठेवले आहे. त्यांचे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक ' द ॲबसॉर्बड माईंड' हे भारतामध्ये त्यांनी दिलेल्या व्याख्यान मालेच्या आधारावर लिहिले आहे. हे पुस्तक भारतातच प्रसिद्ध केले होते.

जागतिक महायुध्दानंतर त्या युरोपात परतल्या आणि

पुनःश्च त्यांच्या शिक्षण पद्धतीचा प्रचार होऊ लागला. हॉलंड मधील त्यांच्या घरात त्यांचा वाचन लेखनात वेळ जात असे. एक्याऐंशी वर्षांचे वय झाले होते. व त्या मे महिन्यात अफ्रिकेतील घानादेशांचे त्यांना निमंत्रण आले. 'अफ्रिकन देशातील बालकांना माझ्या मदतीची गरज आहे. तेव्हा मला गेलचं पाहिजे' असा दृढनिश्चय त्यांनी केला. परंतु अफ्रिकेचा नकाशा शोधायला खोलीबाहेर गेलेला त्यांचा भाचा परत येईतोवरच त्यांना देवाज्ञा झाली होती.

घानाच काय जगातील कोणत्याही देशातील मुलांना त्यांची गरज पडली तर त्या खचितच तिकडे गेल्या असत्या!

**विशाखा देशपांडे**

ठाणे अभ्यासगट सदस्य

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

Vishakha_d22@rediffmail.com

**दिशा**

**वर्गणीसाठी संपर्कः**

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर,**

**नौपाडा, ठाणे.**

**दूरध्वनी २५४२६२७०**

## श्री समर्थ रामदासस्वामी यांचे चरित्र

**श्री समर्थ रामदासांचे चरित्र -**

**१. जीवनपट (संक्षिप्त) -**

एकूण ७३ वर्षांचे दीर्घ आयुष्य

**इ.स. १६०८** -जांब (जि. औरंगाबाद) येथे चैत्र शुद्ध नवमीस जन्म. नारायण असे नामकरण.

आई -राणुबाई, वडील-विठ्ठलपंत. आडनाव - ठोसर.

**इ.स.१६१५** - समर्थांची मुंज.

(समर्थांचे वडील १००१/१२०० सूर्यनमस्कार घालीत तर समर्थ नित्य २००० नमस्कार घालीत.)

**१६२०-३२** -एकूण १२ वर्षे प्राचीन ग्रंथांचा अभ्यास - मनन चिंतन. जप साधना. तेरा कोटी जप संपल्यावर (१६३२) श्रीरामांचा सगुण साक्षात्कार.

**१६३२-४३** -एकूण १२ वर्षे -आसेतु-हिमालयाचा संचार. तीर्थयात्रा.

काही शिष्यांचा यात्रेत लाभ. तीर्थयात्रा संपवून महाराष्ट्रात परतल्यावर आई राणूबाई यांची भेट.

**१६४४-४७** -मारुतींची स्थापना.

**१६४९** -चाफळजवळ शिंगणवाडीस शिवाजी राजांची भेट. पुढे सज्जनगडावर वास्तव्य.

**१६५०-८१** -एकूण ३० वर्षे. या काळात रायगड जवळील शिवथर घळीत 'दासबोध' चे लेखन. अनेक ग्रंथांचे व स्तोत्रांचे लेखन. भक्तिप्रचार व मठस्थापना इ. कार्ये. संभाजी राज यांस मार्गदर्शनपर पत्र.

तंजावरहून आणलेल्या राम-सीता-लक्ष्मण यांच्या मूर्तींची माघ वद्यात सज्जनगडावर स्थापना. नंतर चार दिवसांनी म्हणजे माघ वद्य नवमीस रामदासांचे निधन (समाधी) शनिवार दि. २२ जानेवारी १६८१.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*तत्वज्ञानात्मक बैठक असणाऱ्या या लेखात चिंतनाच्या अनुषंगाने अनेक मानक शास्त्रांचा विचार केलेला आहे.*

*- संपादक*

## मानवी मूल्यांचा निचांक :

दिशाच्या मागील अंकात 'नोईडा हाऊस' मधील बालहत्याकांडावरच्या लेखात **'मानवी मूल्यांचा नीचांक** गाठल्याचे दर्शन 'मानवी समाजाला' पहायला मिळाले, त्याचा निषेधात्मक उल्लेख केला होता. प्रश्न हा आहे की, सर्व जगाला आदर्श होऊ शकेल अश्या भारतीय संस्कृतीच्या पवित्र भूमीवर हा 'भीषण, आसुरी' प्रकार का घडावा!!

## सांस्कृतिक मूल्यांचा वारसा :-

ह्याचे एक उत्तर आहे. ह्या पृथ्वीवर किंवा तिच्या भूभागावर जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला त्या त्या भूभागावर दृश्य व अदृश्य अश्या **सांस्कृतिक मूल्यांचा वारसा मिळतो.**

## संस्कार क्रिया :-


तसा भारतभूमीवर, वैदिक संस्कृतीचा वारसा, हिंदू समाजाच्या जिवंत अस्तित्वामुळे, प्रत्येक भारतीयाला मिळतो. ह्या क्रियेला 'संस्कार क्रिया' असे म्हणता येईल.

सध्याच्या शिक्षणपद्धतीत ही पारंपारिक "वैदिक संस्कार क्रिया" पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यांत आली आहे. समाजाच्या कुटूंब व सामाजिक जीवनातूनही ती तडीपार झाली आहे. तिचे काही अवशेष ज्या कर्मकांडी किंवा धार्मिक क्रिया किंवा कौटूंबिक संस्कार, 'समारंभाच्या' कृती मध्ये दिसतात, त्यांचाही शुष्क 'अस्थि सांगाडा' अस्तित्वात आहे व त्यांतील सशक्त चैतन्ययुक्त रहस्यात्मक, **'आगम'** अश्या मानसिक, स्पिरीच्युअल क्रिया नष्ट झाल्या आहेत. ह्या सांगणारे पुरोहित, आचार्य, गुरु हे पोकळ शब्द भांडार व **'बहिर्गत या तु'** स्वरुपे सांभाळत आहेत.

हे का झाले याची ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय व इतर कारणे ज्ञात आहेत व त्यावर पुष्कळ चर्चा झाल्या आहेत, होत आहेत, होणार आहेत.

## पुनरुज्जीवन :-


आपल्याला सध्या महत्वाचे आहे ते हे की ह्या संस्काराक्रियेचा वैदिक अर्थ व विनीयोग पूर्णपणे पुनरुज्जीवित व्हावा व त्या क्रिया पुन्हा सशक्त पणे प्राप्त व्हाव्या. पण, त्यासाठी एक विशेष आवश्यकता महत्वाची आहे. 'भारतीय वैदिक विश्वसंरचनेचा आराखडा, आशय व त्यावर विश्वास असणे निर्णायक स्वरुपाचे आहे.




चित्र नं. १


सोबत चित्र नं १ मध्ये ही यंत्रणा प्रतीकात्मक पद्धतीने दर्शविलेली आहे. पृथ्वीवरचे मानवी आयुष्य सरासरीने १०० वर्षे (१ वर्ष म्हणजे पृथ्वीची सूर्याभोवती एक प्रदक्षिणा) आहे. हा आहे एका वैश्विक शिक्षण पद्धतीचा 'मर्त्य देहात' असणाऱ्या 'मानवी आत्म्यावरच्या संस्काराचा'

काळ. पण, ह्या आत्म्याला शारिरीक 'पास्ट लाईफ' व 'फ्युचर लाईफ' ह्यांच्या 'Cyclic' प्रवास यंत्रणेचा कार्यक्रम लागू आहे. त्यामुळे, संस्काराची क्रिया जन्मजन्मांतरींच्या वेळापत्रका बरहुकूम 'निसर्गाच्या (परमेश्वराच्या) योजने प्रमाणे घडत रहाणार आहे.




चित्र नं. २

चित्र नं २ मध्ये (Two Supports) मध्ये एक 'स्पिरीच्यूअल व दूसरे मटेरियल' (भौतिक) आधारभूत जाळे एकत्र मिळून 'संस्कार क्रिया' करीत असतात.





चित्र नं. ३

चित्र नं ३ मध्ये हीच यंत्रणा 'व्यक्त व अव्यक्त' विश्वाच्या संदर्भात दाखविली आहे. ह्या यंत्रणेचा संदर्भ 'पुरुषसुक्तातील' व्यक्त (Manifest) व (Unmanifest) अव्यक्त विश्वाच्या संकल्पनेवर आधारभूत आहे.

**<u>भारतीय गुलाम</u> :-**

भौतिकवादात 'व्यक्त जगालाच' फक्त अस्तित्व प्रदान केलेले आहे. सध्याचा 'भारतीय मानव' 'अव्यक्त जगाच्या' अस्तित्वाबद्दल पाश्चात्य सांस्कृतिक विश्वाच्या मानसिकतेचा 'गुलाम' आहे. त्यामुळे, ह्या दोन 'गुणात्मक विभक्त' पण वैश्विक 'एकात्म' पध्दतीच्या जीवनप्रवास व संस्कारक्रिया याबद्दल संशयीत व अविश्वासाच्या 'तथाकथित' 'Phsical Reality' च्या भूमिकेवर उभा आहे.

संस्कार क्रियेचा लाभ उठवावयाचा असेल तर त्या जीवाला ह्या क्रियेला जी रचनात्मक योजनाबद्धता आहे. त्यावर विश्वास व त्या क्रियेत सहभाग आवश्यक आहे. तो नसल्यास ही एक 'जबरदस्तीची क्रिया' होईल व तिचा खरा लाभ किंवा परिणाम होणार नाही-कमी प्रमाणात होईल.




चित्र नं. ४

चित्र नं. ४ मध्ये मानवी जीवाच्या पृथ्वीवर होणाऱ्या 'जन्माची' वैश्विक क्रिया व 'यज्ञक्रिया' दाखविल्या आहेत. ह्याचा आधार 'छांदोग्य उपनिषद' हा आहे. ह्या '५

यज्ञ क्रियांना' 'पंचाग्नि विद्या' असे नाव आहे. ह्यांतील महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांतील प्रथम घटना म्हणजे 'Spintual Body' 'स्वर लोकात' तयार होणे ही होय. ह्याला एक प्रथम 'अग्निहोत्र' म्हणले आहे.

ह्यांतील 'अग्नि' हा ऋग्वेदांत वर्णन केलेला 'अग्नि' आहे. तो 'जातवेदस्' जन्मापासूनच ज्ञानी आहे व तो वैश्विक पदार्थांवर 'संस्कार' 'Transformation' करण्याच्या ताकदीचा आहे.

Hymns To Agni :-

महायोगी अरविंद ह्यांचे ह्या 'अग्नि' बद्दल वैदिक 'Hymns to Agni' हे पुस्तक प्रमाणभूत मानावयाला हरकत नसावी.

**Foetus as a Consumer** ह्या संदर्भात ता. ६-३-२००७ च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकात पहिल्या पानावर एक वृत्त आहे.

## Foetus is a consumer too: Court

State Panel Asks Insurance Co To Pay For Deaath Of Unbom Child In Car Mishap

Jahangir B Gal



Is an unborn child a consumer entitled to insurance coverage? A pregnant woman is a consumer_ But can the foetus in the womb be considered a separate entity in respect of which an insurance claim can be made? This unique case was recently decided through a landmark judgement of the Maharashtra State Commission in the case of Kanta Mohanlal Kotecha v/s The Branch Manager, United India Insurance Co Ltd. The judgment was delivered on November 6, 2006 by Justice B b Vagyani on behalf of the bench presided over by him along with members P.N Kashalkar and Swati Lele.

The case concerns a comprehensive insurance policy taken by Mohanlal Kotecha for his Maruti car. The policy included coverage of Rs 1 lakh each to three unnamed passengers and Rs 2 lakh for the owner-driver. Both Mohanlal and his son Atul held valid driving licences. One night, when Mohanlal, his son Atul (who was driving) and Atul's wife Swati (Who was seven months pregnant) were travelling in the car on the Yavatmal-Nagpur road, they met with an accident. All of them died on the spot.

Mohanlal's widow Kanta Kotecha lodged a claim with the insurance company. The insurance company agreed to pay the claims for the deaths of Mohanlal and Swati. However, it refused to pay the claim in respect of Atul on the ground that he was not a paid driver. **It also refused to pay the claim in respect of the foefus on the ground that an unborn child could not be treated as a passenger.**

Kanta then filed a consumer complaint before the Yavatmal disrict forum in respect of the claims for Atul and the unborn child. The complaint was opposed by the insurance firm. After hearing the parties, the forum directed the insurance frimto pay the claim in respect of Atul's death.

## Foetus order a boost for human rights

However, the forum concurred with the insurance company that an unborn child could not be treated as a passenger and upheld the rejection. Against this order, Kanta filed an appeal before the Maharashtra State Commission.

The commission considered the Unborn victims of Violence Act 2004 in **American law, which grants personhood to a human foetus, and observed that the law was not static but an instrument of socio-economic,change and a branch of social engineering. According to science, during the second trimester of pregnancy-from the 13th to the 27th week the embryo turns into a foetus and attains a recognisable human form. The scientific terminology 'human foetus' implies that a human is present where to organism is alive and growing and possesses a unique genetic code. Hence an unborn child in the womb is a living beling entitled to personhood.** The commission noted that as per the sonography reports, there were no foetal anomalies. The postmortem report also showed the presence of an enlarged uterus with foetus and placenta commensurate with seven months's pregnancy. Hence, it said, the claim in respect of the unborn child was maintainable.

The commission observed that the policy covered four persons (three passengers and the owner-driver). At the time of the accident, there were three adults and the unborn child in the car. So, all were entitled to insurance coverage. Accordingly, **the commission directed the insurance company to pay the claim for the death of the unborn child, amounting to Rs 1 lakh as per the policy, along with interest and costs.**

**This landmark ruling has recognised the value of a human life which is still to be born and is a positive boost not only for the consumer movement but also for human rights.**

(The author has won the Govt of India's National Youth Award for Consumer Protection. E-mail jehangir_gai@indiatimes.com)

त्याचे शीर्षक आहे

"Foetus is a Consumer too : Court

State Panel Asks Insurance Co To Pay For Deaath Of Unborn Child In Car Mishap"

म्हणजे मानवी अस्तित्वाची वास्तविकता किंवा प्रथम उगम हा 'Foetus' च्या दर्शनावर (मातेच गर्भातल्या) आधारलेला असावा व हा 'जीव' भौतिक जगातला 'राजकीय, आर्थिक व सामाजिक अस्तित्वात' आता आनंदाने सामील होऊ शकतो व त्याच्या मृत्युबद्दल त्याच्या 'रक्त-संबंधी' किंवा जीवासंबंधी नाते असलेल्याना 'मारुती मोटारच्या कॉम्प्रिहेन्सिव्ह अॅक्सिडेंट इंश्यूरन्स पॉलिसीचे कॉपेंसेशन मिळू शकते. कारण-कारण, **तो आता 'कंझ्युमर' झाला आहे. वा खूब! केव्हढी ही जाण व केव्हडे हे सामाजिक न्याय संस्थेचे औदार्य!!**

मानवी अस्तित्वाचे "वेदज वा मनसीज" बीज व त्याचा वैश्विक संक्रमणाचा मार्ग ह्याबद्दल नुसतेच पाश्चात्य जग नव्हे तर 'भारतीय न्यायसंस्था' सुध्दा 'अजाण' आहे. मग सर्वसामान्य माणसावरच्या 'संस्कार यंत्रणेला' वास्तवाचे दर्शन कोण देणार? हक्क कोण देणार? भारतीय संस्कृतीचे वारसदार ह्यांची ह्या ज्ञानाबद्दलची जागरुकता किती आहे? हे प्रश्न निर्माण होणारच!!

**वेदज मनसीज सृष्टि बीज निर्माती :-**

"सृष्टीच्या प्रारंभी विशिष्ट प्रकारची मानसिक प्रवृत्ति घेऊन भिन्न भिन्न मैथुनिक जनसमुदाय उत्पन्न झाले. त्यातुनच मैथुनिक सृष्टि होऊ लागली

१. उदभिज्

२. स्वेदज्

३. अंडज

४. जारज

ही चतुर्विध सृष्टि प्रसिद्ध आहे. अजुनहि 'वेदज' सृष्टि किंवा 'मनसीज' सृष्टि म्हणजे जी ह्या विश्वनिर्मीतीच्या काळात केवळ संकल्पशक्तीने, म्हणजे ज्ञानावर निर्माण होते, याची संकल्पना जाणीवेत नाही. 'बीज' हे अश्या क्रियेनेच निर्माण झाले.

त्यामुळे, पुरुषसुक्तात (ऋग्वेद) एका प्रकारच्या यज्ञ क्रियेने 'बीज' रूपाने सृष्टि निर्माण झाली व वृद्धिंगत झाली, अश्या दर्शनावर मर्त्यमानव समाजाचा विश्वास बसण्यास अडचण दिसते !!

**संस्कारशून्य सामाजिक बदल :-**

समाजात 'आदर्श बदल' घडवून आणण्याच्या प्रयत्नात जे जे राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था व इतर गुंतलेले दिसतात. त्यांना 'मानवी जीवावर' संस्कार केल्याशिवाय हे बदल ''चिरस्थायी'' होणार नाहीत, याची पुरती जाणीव आहे, असे दिसत नाही. शिवाय, या संस्कारक्रिया ह्या एक 'वैश्विक पातळीवरचे शास्त्र आहे व त्यांत 'अव्यक्त जगात' व व्यक्त जगांतही ज्या ज्या 'शक्ती' आहेत त्यांचा सुयोग्य वापर व विकसित नैतिक दिशेने, सृष्टि संमत असा वापर, योजना व आवाहन करावे लागते याची सुतराम जाणीव दिसत नाही. ह्याकरीता त्या मानवाची व समाजाची शारिरीक व मानसिक अवस्था अनुकूल करणे आवश्यक असते हे माहीत नाही.

**दैशिकशास्त्र एकात्म मानव दर्शन:-**

याबाबत **श्री. १०८ सोंबारी महाराज** यांनी कथन केलेल्या 'दैशिक शास्त्रातील' कांही संदर्भ महत्वाचे आहेत. ते पुष्कळ विस्तृत असल्याने त्यांतील काही भाग येथे उद्धृत करतो. **पंडित दीन दयाल उपाध्याय** यांनी त्यांच्या 'एकात्म मानव दर्शन' या ग्रंथात या संकल्पनांचा अंगीकार केलेला आढळेल. हा प्रयत्न त्यांनी **प.पूज्य श्री. गोळवलकर गुरुजी,** (R.S.S) सरसंघचालक यांच्या आदेशावरुन केला होता. **'परिपूर्ण मानव'** निर्माण करणे हा सामाजिक, सांस्कृतिक हेतू ह्या कार्यासाठी अनुस्यूत होता. **महायोगी अरविंद** यांनी हाच हेतू 'Divine Life' ह्या शब्दात, **''दैवीसंपदा समाज''** ह्या सारख्या पारंपारिक शब्दात किंवा **भगवदगीतेत् 'पूरुषोत्तम योग'** ह्या संदर्भात आणि **संत ज्ञानेश्वर** ह्यांच्या **'सज्जनांची मांदियाळी'** या संदर्भात - एकाच दिशेने समाजाच्या परिवर्तनाची इच्छा व आदर्श व्यक्त केलेले आढळतील.

पण, मग त्यासाठी 'शास्त्रीय प्रयत्नांची आवश्यकता आहे. !!

भारतीय (वैदिक) अधिजीविक शास्त्राप्रमाणे मनुष्य संस्कारमय असतो.

संस्कार चार प्रकारचे आहेत.

१. जन्मान्तर

२. सहज

३. कृत्रिम

४. अन्वयागत

शरीरी मानव एका शरीराचा त्याग करुन दुसऱ्या शरीरांत ज्याच्यासह प्रवेश करतो त्यास **'जन्मान्तर संस्कार'** म्हणतात.

**'सहज संस्कार'** हे तन्मात्रिक शरीरास बिदुवस्था, व गर्भावस्था यात प्राप्त होतात. त्याचे तीन प्रकार आहेत. अ) योनिसंस्कार आ) जातिसंस्कार इ) वर्णसंस्कार''

**'कृत्रिम संस्कार'** हे **''बाह्याभ्यन्तरिक संनिकर्षामुळे''** वा दीर्घाभ्यासामुळे निर्माण होतात.

पितृवंश व मातृवंश यांच्याकडून जे संस्कार वारसरुपाने मिळतात त्यास **'अन्वयागत संस्कार'**

म्हणतात.

आधिजीविक शास्त्राच्या वा सिद्धान्ताच्या आधारावर आमच्या आधिजननिक शास्त्रात खालील गोष्टी मुख्य मानल्या आहेत.

१. वंशात परंपरागत संस्कार उच्च असणे.
२. दंपतिचे जाति व वर्ण एक पण गोग व पिंड भिन्न असणे.
३. दंपतीच्या गुणात साम्य
४. पित्याचे 'ब्रम्हचर्य' आणि मातेचे ''पतिदैवत्व''
५. संततोत्पादन केवळ पूर्ण तारुण्यातच
६. गर्भाधान संस्कार
७. दोहद पूराण
८. पुंसवन
९. अनवलोकन
१०. सीमन्तोन्नयन
११. गर्भभूमहति
१२. जातकर्म
१३. शैशव संस्कार.

या अनेक संस्कारक्रियांच्या अर्थ वा महत्व समजण्यासाठी जे 'शास्त्रीय ज्ञान' आवश्यक आहे त्याचा आज लोप झाला आहे.

पण, त्याचा थोडातरी परिचय सूत्रपद्धतीने व्हावा म्हणून काही उतारे देतो.

'ब्रम्हचर्याने' पुरुषात तीव्र श्रद्धा, म्हणजेच श्रेष्ठ गुणांकडे तीव्र रसवाहिनी उत्पन्न होत असते आणि 'पतिदैवत्वाने' स्त्रीत तीव्र लज्जा म्हणजेच नीच कर्मासंबंधी तीव्र स्वरसंवाही संकोच उत्पन्न होत असतो.

**श्रद्धा व लज्जा** ज्या समाजात श्रद्धा आणि लज्जा यांचे जितके आधिक्य असेल तितका तो समाज श्रेष्ठ होतो व त्या समाजात याची जितकी कमतरता असेल तितका तो नीच होतो. अर्थात त्यात सुख शांति यांचा तितका अभाव होत असतो. वस्तुत: समाजाचे पालन श्रद्धा व लज्जा यांनीच होते. म्हणून देवतांनी भगवतीची स्तुती पुढीलप्रमाणे केली आहे.

<u>''श्रद्धा सतां कुलजन प्रभवस्य लज्जा</u>

<u>तां त्वां नत: स्म परिपालय देवि विश्वम्</u> ॥

<u>दोहदपूरण :</u> जेव्हां गर्भस्थ जीवाचे हृदय बनत असते त्यावेळी जनमांतर संस्काराप्रमाणे त्या बनत असलेल्या हृदयात काही इच्छा प्रकट होतात. तीच इच्छा गर्भवती स्त्रीच्या हृदयात डोहाळ्यांच्या रुपाने उठत असते.'' ही इच्छा पूर्ण करणे आवश्यक नाहीतर गर्भस्थ जीवाचे एखादे अंग वा नाडी यात काही विकृति येऊन जाते.

**<u>सामुद्रिक शास्त्राप्रमाणे :</u>** अंग व नाडी यांचा स्वभावाशी अत्यंत घनिष्ट संबंध राहत असतो.

**<u>स्वामी दयानंद सरस्वती :</u>** आर्यसमाजाचे आद्यप्रवर्तक स्वामी महर्षि दयानंद सरस्वती ह्यांनी समाजाला वैदिक शास्त्रावर आधारलेल्या संस्कारांचा परिचय व साधना सुसुत्रपणे व शुद्ध स्वरूपांत देण्यासाठी पुष्कळ परिश्रम केले.

<u>''संस्कारविधि:''</u> वेदानुकूलैर्गर्भानान्त्येष्टिपर्यन्तै: षोडशसंस्कारै: समन्वित: - आर्यभाषया प्रकटीकृत: असे पुस्तक आर्यसमाजाने प्रसिद्ध केले आहे.

त्यामध्ये ''भूमिका'' सांगताना ते म्हणतात ''यहां तो केवल क्रिया करनी ही मुख्य है, जो जिस करके <u>शरीर और आत्मा सुसंस्कृत</u> होने से धर्म, अर्थ, काम और मोक्ष प्राप्त हो सकते है और सन्तान अत्यंत योग्य होते है इसलिये संस्कारों को करना सब मनुष्यो को अति उचित है। यहा सब मंत्रो का अर्थ नही लिखा है, क्योंकि इसमें कर्मकाण्ड का विधान है, इसलिये विशेषकर क्रियाविधान लिखा है और मंत्रो के यथार्थ अर्थ मेरे किये ''वेदभाष्य'' मे लिखे ही है, जो देखना चाहे वहाँसे देख लेवे।''

संस्कारक्रियांचे हे कर्मकांडी स्वरुप थोड्याफार फरकाने काही पुरोहितांनी संभाळले आहे. पण, माझ्या मते त्यामध्ये गुप्त शक्ति, देवता, अग्नि (ऋग्वेद वर्णित) ह्यांचे आवाहनाचे जे 'मंत्र' आहेत. ते सिद्ध केलेले पुरोहित मात्र दिसत नाहीत.

**यज्ञसंस्था दिशा**

माझी 'यज्ञसंस्थेच्या' कर्मकांडावर जी टीका दिशाच्या मागील डझनभर लेखांत मांडली आहे तीच इथेही लागू आहे. त्यामुळे ह्या संस्कारक्रिया सुद्धा जिथे केल्या जातात त्या बहिर्गत, कर्मकांडी व शुष्क साधनाच आहेत असे माझे स्पष्ट मत आहे त्या पुनरुज्जीवित व मंत्रचैतन्ययुक्त कराव्या लागतील.

**नैतिक उंची:-** सध्याच्या भारतीय समाजात जरी ह्या संस्कारक्रियांचे ज्ञान व आचरण दिसत नसले तरी ह्या सगळया योजनेचा हेतू, संकल्प पाहिला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवेल की समाजाला नैतिक उंचीला नेण्याचा **हा वैश्विक उपक्रम** संकल्पिलेला आहे. त्याचे **एक Integral Science एकात्म शास्त्र आहे**. वैदिक विश्वरचनेचे स्वरुप, उद्देश व हेतू, मानवी जीवनाची वैश्विक वाटचाल-जन्मजन्मांतरीची, निसर्ग व आयुर्वेद ह्या अनेक गोष्टींचा एकात्म उपयोग इथे योजिला आहे. वैश्विक शक्ति ज्यांची नांवे देवता स्वरुपांवर वर्णिली आहेत, त्यांचे मंत्रशास्त्राने आवाहन व हातभार या संस्कारक्रियेमध्ये योजून मानवीसमाजाचे अर्ध्वयू एका नैसर्गिक यंत्रणेमधील मानवी जीवाला दिव्यत्वाकडे नेण्याचा उपक्रम पार पाडीत होते. त्याचा आवाका जन्मापासून मृत्युपर्यंत ह्या पृथ्वीवरच्या वास्तव्यापुरता मानवी मर्यादेत असला तरी तो पुनर्जन्म ह्या Cyclic Scheme शी सुसंगतपणे जोडलेला होता. ह्या संस्कारक्रियेला जी स्थिर अशी राजकीय न सामाजिक, आर्थिक बळकटी लागते तिची योजना आज नसल्याने किंवा आक्रमणे झाल्याने पडझड झाल्याने, ही सगळी यंत्रणा विस्कळीत, हेतू विस्मरण, तंत्राची मोडतोड व रहस्यांचे विस्मरण झाल्याने, निकामी झाली आहे. पण तिच्या संकल्पनेत विलक्षण सामर्थ्य व हेतूशुद्धता आहे. भारतीय समाजाला त्याचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरावे.

**पाश्चात्य प्रभाव:-**

समाजाच्या सद्यस्थितीच्या मानसिकतेचा उल्लेख आवश्यक ठरावा. त्यावर सध्यातरी पाश्चात्य संस्कृतीतील मानवी तर्कपद्धती व विश्वास ह्यांचा अंमल आहे.

" The mind is at birth a clean sheet, a **"Tabula Rasa"**, and sense-experience writes upon it in a thousand ways, until sensation begets memory and memory begets ideas - **J.Locke**

"मन हे जन्मकाळी एका स्वच्छ स्लेटपाटी सारखे असते ("ताबुला रसा"), आणि इंद्रियगम्य अनुभव त्यावर आपले संस्कारभाष्य लिहीतात. हजारो मार्ग व पद्धतीने. त्यानंतरच स्मृती तयार होते आणि ह्या स्मृतींवरच पुढील संकल्पना उभ्या राहतात - जे लॉक"

ह्या विधानांचा अंमलच सत्य मानून एभौतिकवादी अहंकारी ज्ञान संकल्पनेतूनच हिटलर, स्टालिन व माओ त्से तुंग ह्यांचे सामाजिक परिवर्तनाचे नाझी, साम्यवादी कम्युनिस्ट प्रयोग सुरु झाले. त्यांचा छोटेखानी परामर्ष मी दिशाच्या एका अंकात मागेच घेतलेला आहे.

**निसर्गाची भागीदारी:-**

निसर्गाला मानवसमाजाच्या निर्मितीत व सांस्कृतिक घडणीत काहीच श्रेय, वाटा किंवा भागीदारी नाही असा भौतिकवादी समाजशास्त्राचा अहंकरी दावा दिसतो. त्यामुळे 'संस्कार ही क्रिया फक्त मानवी समाज किंवा मानव

(पान क्र. ३२वर)

# देह त्यागिता

*मनाच्या श्लोकांतील समर्थांचा एकेक शब्द, एकेक विचार माननीय आहे. अशाच एका विचाराबद्दल - संपादक*

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज हे जसे ज्ञानेश्वरीपेक्षां त्यांच्या हरिपाठामुळे बहुजन समाजाला ज्ञात आहेत त्याचप्रमाणे दासबोधापेक्षा मनाच्या श्लोकांमुळे श्री समर्थ रामदास हे सर्व लहानथोरांना परिचित आहेत. मनाच्या श्लोकांमधून त्यांची लोककल्याणाची तीव्र तळमळ दिसते त्यामुळे या लोककल्याणाच्या तीव्रतेमुळे त्यांची मनाच्या श्लोकांमधील भाषा नैसर्गिकपणे ओघवती, अत्यंत प्रासादिक, प्रगल्भ, अत्यंत तेजस्वी व अर्थपूर्ण आहे. प्रत्येक श्लोकांत त्यांनी एक किंवा अधिक सुंदर विचारांची गुंफण केली आहे. भाषा सुलभ असल्यामुळे हे श्लोक म्हणणाऱ्याच्या व ऐकणाऱ्याच्या मनावर झटकन परिणाम करतात. त्यामुळेच खूप लोक 'मनाचे श्लोक' नियमाने वाचतात. या श्लोकांची लोकप्रियता एवढी आहे कीं शाळाशाळांतून किंवा घरोघरी लहान मुलांकडून या श्लोकांचे पाठांतर करुन घेतात व मुलांना उत्तेजन मिळावे यासाठी स्पर्धाही घेतल्या जातात. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी लिहिलेले हे वाङमय अजूनही बोधप्रद व ताजेतवाने आहे.

या बोधप्रद अशा २०५ मनाच्या श्लोकांमधून 'देहे त्यागिनां कीर्ति मागे उरावी' या श्लोकाचे माझ्या अल्पबुद्धीप्रमाणे विवेचन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

देहे त्यागितां कीर्ति मागे उरावी

मना सज्जना हेचि क्रिया धरावी।

मना चंदनाचे परी त्वां झिजावे

परी अंतरी सज्जना नीववावे॥

कोणताही सजीव प्राणी, मनुष्य असो किंवा किडामुंगी असो तो जन्ममृत्युच्या फेऱ्यातून कधीचं सुटत नाही. ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू अटळ आहे. नुसते जन्म व मृत्यू असे कीडामुंगीसारखे जीवन न जगतां मरणोत्तर आपली कीर्ती मागे राहील असे दैदीप्यमान जीवन जगावे म्हणूनच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी दासबोधात म्हटले आहे कीं

मरणाचे स्मरण असावे। हरिभक्तीस सादर व्हावे।

मरावे कीर्तिस उरवावे। येणे प्रकारे॥

मानवाने आपल्याला कधीतरी मरण येणार आहे याचे सतत स्मरण असू द्यावे व तरीसुद्धा जन्मभर संसार नेटका हरिभक्तीतही रममाण व्हावे परोपकारी वृत्ती ठेवावी त्यामुळे मृत्यूनंतर सुद्धां लोक आपल्याला नावे ठेवणार नाहीत तर आपली कीर्तीच लक्षात ठेवतील.

श्रीसमर्थ रामदासांनी 'देहे त्यागितां' या मनाच्या श्लोकांत 'सज्जन' हा शब्द संत किंवा सत्पुरुष या अर्थाने वापरला आहे. मनुष्याने जन्मभर जास्तीत जास्त सत्कृत्ये करावीत. स्वत: काया वाचा मनाने चंदनवृक्षाप्रमाणे झिजावे व सज्जन लोकांच्या अंत:करणाला समाधान व आनंद होईल असे वागावे. मनुष्याने केवळ कीर्तीसाठी सत्कर्म आचरणात आणू नये तर सत्कर्मासाठीच सत्कर्म करावे. कीर्ती त्याचे अनुषंगिक फल होय. जसा चंदनवृक्ष हा फलकुसुमवर्जित असून शरिराचा दाह नाहीसा करणारा, शीतलता देणारा, परोपकारी व सेव्य: स्वादिह सर्वलोकमनसानंदनश्चंदन:। असा सर्व लोकांना प्रिय आहे

तसेच मनुष्याने सुद्धा चंदनवृक्षासारखे झिजून परोपकारी वृत्ती ठेवून वागावे म्हणजे मृत्यूनंतर सुद्धा आपली कीर्ती लोक जन्मभर गातील. 'मरावे परी कीर्तीरुपे उरावे' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे आपल्या देशांत अनेक थोर महात्मे होऊन गेले. अगदी, तीनशे वर्षापूर्वीचे श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या काळातले उदाहरण द्यायचे झाले तर त्यांचे परमशिष्य श्री शिव छत्रपती महाराजांचे उदाहरण देता येईल. शिवाजी महाराजांच्या आपल्या हिंदुस्थानातील गरीब प्रजेवर परकीयांकडून अनन्वित अत्याचार होत होते या गुलामगिरीच्या जोखडांतून व स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांतून आपल्या देशाचे, धर्माचे संरक्षण करण्याकरिता शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली अनेक शूरवीरांनी बलिदान केले. नरवीर तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे अशा कित्येक ज्ञात व अज्ञात वीरांनी आपले देह अर्पण केले व ते कीर्तीरुपाने अजरामर झाले. या शतकातील लो. बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, नेताजी सुभाष, म. गांधी, महर्षी कर्वे, म. ज्योतिबा फुले अशा देशासाठी व समाजासाठी देह झिजविणाऱ्या महात्मांची नांवे कीर्तीरुपाने अजरामर झालेली आहेत या सर्व थोर नेत्यांना माझे शतशः प्रणाम.

'दिव्यत्वाची जेथ प्रचिती।
तेथे कर माझे जुळती॥

जय जय रघुवीर समर्थ

**सौ. मालती देवधर**

कलाविहार, प्रशांतनगर,
नौपाडा, ठाणे
दू. क्र. २५४० ३४६०

### गुलाबाची काही वैशिष्टे

१. गुलाब ही वनस्पती किती जुनी? सुमारे ३ कोटी वर्षापूर्वी मानवापूर्वी अस्तित्वात असावी; असा अंदाज!

२. गुलाबाच्या वनस्पतीकुलास शास्त्रीय भाषेत 'रोझेसी' म्हणतात. या कुलात सफरचंद, चेरी, पीच, स्ट्रॉबेरी इत्यादी फळे वनस्पती येतात आणि त्याची प्रजात आहे 'रोझा.'

३. रानटी गुलाबाला फक्त पाच पाकळ्या असतात.

४. या गुलाबापासून संकराने सध्याचे सुमारे शंभर पाकळ्या असलेले आणि निरनिराळ्या रंगांची सुंदर, डौलदार, सुगंधी फुले देणारे गुलाब तयार करण्यात आले आहेत.

५. शास्त्रज्ञांच्या मते गुलाबाची उत्पत्ती प्रथम आशिया मायनर व पश्चिम चीन या भूप्रदेशात झाली असावी.

६. गुलाबाची फुले विविध आकारांची असतात. बटणाएवढी लहान ते तळहाताच्या वाटीएवढी मोठी!

७. स्वच्छ पांढरा ते लाल, गुलाबी, पिवळा, नारंगी अशा अनेक छटांचा गुलाब लोकप्रिय आहे आणि आता तर प्रयोगांती निर्माण होतोय निळा गुलाब!

८. गुलाबाच्या फुलात सुमारे ०.०१५ ते ०.०४०६ टक्के अत्तर असते. ते काढून जे पाणी उरते त्याला 'गुलाबपाणी' म्हणतात.

९. भारतात अत्तर कोठे बनते? अलिगढ व कनौज येथे मोठ्या प्रमाणावर ते बनते. कनौजी अत्तर फारच प्रसिध्द आहे.

१०. गुलाबापासून गुलकंद बनतो. आयुर्वेदिक व युनानी औषधात त्याचा वापर होतो. गुलकंद नुसताही मस्त, चवदार लागतो.

# गीताई नीति कथा

## (भाग ३ रा) - शिवाजीराव भावे

*गीता समजावून घेण्यास उपयोगी ठरतील अशा ग्रंथांचे परिचय दिशातून आम्ही करुन देतो. श्रीमती आशा भिडे यांच्या प्रमाणेच अन्य कोणाला असे परिचय पाठवावयाचे असतील तर अवश्य पाठवावे.*

**गीताविध**

परमधाम प्रकाशन, पवनार जि. वर्धा (महाराष्ट्र)
पृष्ठे १७२, किंमत - १.५०

'गीताई नीति कथा' या शिवाजी भावे लिखित पुस्तकाचा/ भाग ३ माझ्याजवळ आहे. यात १३ ते १८ अध्यायांवरील नीतिकथा आहेत. आधीचे दोन भाग माझ्याजवळ नाहीत. मार्च १९६१ ची आवृत्ती माझ्याजवळ आहे. पुस्तक अतिशय उपयुक्त असे आहे. लहान मुलांना पण या नीतिकथा वाचून गीतेच्या तत्वज्ञानाचा बोध सुलभतेने होईल. गोष्टीरुपात असल्यामुळे मुलांना त्या निश्चित वाचाव्याशा वाटतील व आवडतील. मुलांनीच वाचाव्या किंवा मोठ्यांनी त्यांना वाचून दाखवाव्या, सांगाव्यात इतक्या त्या उपयुक्त आहेत. त्याचे तीनही भाग परंधाम प्रकाशनकडे मिळू शकतील.

आपल्या निवेदनात लेखक म्हणतो, भगवद्गीतेवर इसापनीतीच्या सरणीने भारतीय भाषात आजपर्यंत नीतिकथा रचल्या गेल्या नव्हत्या. कै. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरी नीतिकथांच्या दिग्दर्शनावरुन ही कल्पना सुचली, आणि विद्यार्थ्यांत गीताई प्रचार करीत असता अनुभवावरुन ती उपयुक्त ठरली.

नीतिकथा मुख्यत:शिक्षकांसाठी आहेत. यापासून स्फूर्ती घेऊन अशा हजारो गोष्टी विद्यार्थ्यांना सांगता येतील. या पुस्तकात गीताई च्या गीतेच्या श्लोकांचा समश्लोकी अनुवाद १३ व्या अध्यायातील प्रत्येक श्लोकावर नीतिकथा आहे. कथेचे तात्पर्य व तो श्लोकही दिलेला आहे. सुरुवातीला श्लोकाचे क्रमांक दिले आहेत. एकाच श्लोकावर चार-पाच कथाही दिलेल्या आहेत. आपण नमुन्यादाखल एक-दोन गोष्टी बघुया.

अध्याय १३ वा ॥क्षेत्रक्षेत्रज्ञयोगः॥

१. एक साधू एका खेडेगावच्या पिंपळाच्या पारावर उतरला होता. तेथे बरीच मुले जमा झाली. त्या मुलांना साधूने विचारले, अरे तुम्हाला शेत म्हणजे काय माहीत आहे काय ? तेव्हा मुले म्हणाली, शेत मातीचे असते त्यात धान्य उगवते, साधू म्हणाला, नाही. मी विचारतो ते शेत मातीचे नसते त्यात धान्य उगवत नाही. ते सगळ्यांच्या जवळ असते. गरीब असो श्रीमंत असो, लहान असो मोठा असो. प्रत्येकाजवळ मी म्हणतो ते शेत असतेच. मुले म्हणाली, आम्हाला असे शेत माहीत नाही. आम्हाला दाखवा. असे शेत कोठे आहे? साधू म्हणाला, ते तर आता सुध्दा सगळयांच्याजवळ आहे. अरे, तुमचे शरीर हेच तुमचे शेत. हे शेत कसे आहे ते नीट ओळखले पाहिजे. शेतकरी जमीन कसतात व त्यातून उत्पन्न काढतात. त्याप्रमाणे हे शरीर कसून त्यातून चांगल्या गोष्टी तयार केल्या पाहिजेत. ही खुबी जो जाणतो त्यालाच हे शेत म्हणजे काय ते कळेल. बोला, हे शेत सगळ्यांच्या जवळ आहे ना? आणि ते सगळ्यांनी कसले पाहिजे ना? सर्व मुले एकदम ओरडली हो हो मोठा गलका झाला, मग साधूने मुलांना प्रसाद दिला, प्रसाद घेऊन मुले मनाशी निश्चय करुन घरी गेली.

**तात्पर्य** - या देहरूपी शेताची माहिती मुलांना अगदी लहनपणापासून दिल्याखेरीज यापासून चांगली निष्पत्ती होणार नाही.

**अर्जुना ह्या शरीरास म्हणती क्षेत्र जाणते**
**जाणे हे क्षेत्र जो त्यास क्षेत्र-ज्ञ म्हणती**
**तसे!! १३.१ गीताई**

अध्याय १६ वा !! दैवासुरसंपद्विभाग योगः!!

**अंधार आणि नंदादीप -** मंदिरातल्या नंदादीपाला अंधार म्हणाला, मी येथे आलो असता तू मला घालवून देतोस. देवाच्या संगतीत रहावे म्हणून मी येथे आलो. तेव्हा तू मला घालवून देतोस हे बरोबर नाही: देव संगतीपासून कोणाला वंचित करणे हे योग्य आहे काय? शिवाय नांदा आणि नांदू द्या या थोर तत्त्वाप्रमाणे तू स्वतः नंदादीप म्हणवीत असून मला येथे नांदू देत नाहीस हे ठीक दिसत नाही. त्यावर नंदादीपाने उत्तर दिले अरे तुला नाहीसे करावे म्हणून तर मला इथे नेमले आहे. जे दुसऱ्याच्या दर्शनाच्या आड येतात त्या तुझ्यासारख्यांनी देवसंगतीचे स्तोम माजवावे हे आश्चर्य आहे. मी देवाजवळ हीन गोष्टी यत्किंचितही सहन करणार नाही आणि तिचा शक्य तितका प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही. नंदादीपाचा हा निर्धार ऐकल्याबरोबर तत्क्षणी अंधाराने मंदिरातून पलायन केले.

**तात्पर्य :-** हीन लोकांची गय करण्यात किंवा त्यांना सहन करण्यात निःसंशय तेजोभंग आहे.

**पवित्रता क्षमा तेज धैर्य अद्रोह नम्रता**
**हे त्याचे गुण जो आला दैवी संपत्ती घेउनी**
**!!१६.३ गीताई**

या गीताई नीतिकथा वाचल्यावर निश्चितच त्याची उपयुक्तता आपल्या सर्वांना जाणवेल. अशा इसापनीती कथांसारख्या नीतीकथांच्या माध्यमातून जर गीता मुलांपर्यंत पोचवता आली तर १३ व्या अध्यायातील पहिल्याच गीताई श्लोकावरील कथेतल्या सगळ्यांजवळ असलेल्या शेतातून नक्कीच चांगले पीक उत्पन्न निघू शकेल. फक्त ते शेत चांगल्या रीतीने कसण्याची हमी शिक्षकांनी, पालकांनी घ्यायला हवी. मनापासून, जाणीवपूर्वक केलेली मेहनत, मशागत भारताच्या भावी पिढीचे भविष्य निश्चितच उज्ज्वल करेल.

शाळा-कॉलेजांनी, पालकांनी ही पुस्तके परंधाम प्रकाशन, पवनार येथून मिळवावीत व भावी पिढी योग्य वयातच सुसंस्कारित करावी.

याच पुस्तकात विनोबाजींनी लघुतम कथांचा महिमा या शीर्षकाच्या लेखात म्हटले आहे की, हा आरंभ चांगला असून तडीस पोहोचविण्याजोगा आहे. मागे इतिहाससंशोधक राजवाडे यांनी ज्ञानदेवीतील ओव्यांच्या आधारे ज्ञानदेव-नीति-कथा या नावाने काही गोष्टी लिहून काढल्या होत्या. अशा गोष्टींचा लहान मुलांच्याच नव्हे पण एकूण सगळ्यांच्याच मनावर खोल ठसा उमटत असतो. गीताईच्या आधारावर शिवाजीने अशा गोष्टी लिहिण्याचा जो उपक्रम केला आहे तो स्तुत्य आहे. (मूळ लेख सेवक १९५४ मधून-)

**आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंटस्
आराधना टॉकीज जवळ,
ठाणे प ४०० ६०२.
दूरध्वनी - २५४१०१४०.

दि
शा
नियमित
वाचा.
आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# होय मी वाचन करतो !

*ग्रंथालय सेवा समूहातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त निबंध - संपादक*

होय ! मी वाचन करतो ! सेवानिवृत्त होऊन आजही वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षी ...! सात वर्षापूर्वी एका डोळ्याचे मोती बिंदूचे ऑपरेशन होऊनही खूप वाचन करतो. माझी सकाळ सुरू होते ती मुळी वर्तमानपत्र वाचनापासून. दुपारच्या वामकुक्षीसाठी मला वाचनाची अंगाई लागतेच लागते. तर रात्रीच्या वेळी दिनक्रमाला पूर्णविराम देत निद्राधीन होण्यासाठी मला वाचनाची भैरवीच उपयोगी पडते.

मी रोज कमीतकमी चार दैनिके वाचतो. शिवाय तीन साप्ताहिके, पाच मासिके येत असतात. मी स्वतः कथा, कविता, भक्तगीत, विनोदी चुटकुले वर्षभर लिहीत असतो. ते प्रसिध्द झाल्यावर ते अंक येतात. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे दरवर्षी माझ्या पंधरा वीस कथा कविता महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील दिवाळी अंकातून छापून येतात ते अंक अगदी ठेवणीतले -बौध्दिक खाद्य म्हणून मी वापरतो.

अशा प्रकारे घरात एवढे इष्टान्न आणि मिष्टान्न असूनही काहीतरी अधिक रुचकर, अधिक खमंग.... साजूक बौद्धिक अन्न मिळावे म्हणून ओढाळ झालेले माझे मन कधीही माझी पाऊले सार्वजनिक वाचनालयाची वाट चालवते. तात्पर्य असे की मी वर्षभर दिवसरात्री वाचन करतो... करतो आणि करतो. या पुढेही करणार. माझ्या नयन तारका मंद होईपर्यंत वाचणार. मला लागलेला हा वाचण्याचा छंद या जन्मी तरी चालू राहणार. शक्य होईपर्यंत मी वाचणार.

माझा हा वाचण्याचा छंद माझ्यावर कुणी सक्तीने लादलेला नाही. जणू स्वयंभू आहे हा छंद !

मला आजही आठवतोय तो प्रसंग त्या प्रसंगानेच मला वाचन करण्यास प्रस्फूर्त केले. माझ्या जीवनाला चांगली कलाटणी देणारा तो प्रसंग मला रसिक वाचक करणारा व शेवटून का होईना पण साहित्यिकांच्या रांगेत बसवणारा ठरला. मी इ. ७ वीत होतो. माझा गाव चारही बाजूंनी खाऱ्या पाण्याने वेढलेला, कसल्याही सुखसोई नसलेला, दुर्लक्षित गाव. त्या गावांत शिकणारा मी. अगदी कूपमंडूक वृत्तीचा. एकदा शाळेत एक साहेब आले होते. त्या साहबाने आम्हाला आमच्या अभ्यासक्रमावर बरेच प्रश्न विचारले. आम्ही सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. साहेब खूष झाले. नंतर त्यांनी जनरल नॉलेजवर प्रश्न विचारायला सुरूवात केली. तेव्हा आमची बोलतीच बंद झाली. पोपटासारखी पोपटपंची करणारे आम्ही घुटर्रर घू ऽ ऽ करु लागलो. तेव्हा त्या साहेबाने आम्हाला पाठ्यपुस्तकांशिवाय दुसरी पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला. असेही सांगितले की तुम्ही शहरातील मुलांएवढे हुशार असता पण तुम्ही तुमच्या दप्तरातील पुस्तकांशिवाय दुसरी पुस्तके वाचत नाहीत. आणि शहरातील मुले मात्र वाचतात. म्हणून ती मुले हुशार असतात. शहरात वाचनालये असतात. तिथे खूप पुस्तके असतात. कुणीही जाऊन बसावे आणि हवे ते पुस्तक घेऊन वाचावे अगदी फुकट.

ते वाचनाचे फायदे सांगत असतानाच माझ्या मनात अकस्मात क्षणप्रभे सारखे विचार आले की, आपण हायस्कूलला तालुक्याच्या ठिकाणी पेणला जायचे आणि तिथल्या वाचनालयात रोज जायचे. खूप खूप वाचायचे

आणि साहेब म्हणतात त्याप्रमाणे, शहरी मुलांप्रमाणे आपणही हुशार व्हावचे.

अशा प्रकारे मी पेणला राहून आठवी ते अकरावी ही चार वर्षे खूप वाचन केले. सतराव्या वर्षी एस. एस.सी. झालो. अठराव्या वर्षाशिवाय नोकरी नाही म्हणून एक वर्ष (टायपिंग शिकण्याच्या निमित्ताने) राहून दोनशेहून अधिक पुस्तके (कांदबऱ्या, कथा संग्रह, नाटके, पौराणिक-ऐतिहासिक गोष्टी, बाबा साहेब पुरंदरेंची शिवरायांबद्दलची पुस्तके, रमेश मंत्री, वि. वा. बुवा. चिमणराव, पु.ल., अत्रे यांची विनोदी पुस्तके, साने गुरूजींचे, सावरकरांचे वाङ्मय इ. इ.) अधाशासारखी वाचून फस्त केली. त्याचवर्षी म्हणजे अठराव्या वर्षी डोळ्यांना चाळीशी लागली तरी वाचन कमी केले नाही.

कर्मधर्म संयोगाने मला नोकरी हायस्कूलमध्ये मिळाली. त्यामुळे वाळवंटात राहून अक्षर बीज पेरावे... अंकुरीत करीत वाढवावे असा प्रवास करावा लागला नाही. तिथेही लायब्ररी असल्यामुळे माझ्या अंगवळणी पडलेली सवय आजही टिकून आहे आणि मला खात्री आहे की जो पर्यंत माझ्या नयनांचे नंदादीप कागदावरील अक्षरांच्या पाकळ्या, शब्दांची सुमने आणि ओळींच्या शब्दसरी पाहू शकतील तोपर्यंत मी वाचन करणार ! माझ्या प्रज्ञेला प्राज्ञा येण्यासाठी, माझ्या प्रतिभेला प्रगल्भता येण्यासाठी, माझ्या लेखनकलेला नावीन्याचा शब्दसाज चढण्यासाठी आणि माझ्या शब्द भांडारात नवनवीन शब्दांची भर पडून मी शब्दश्री व्हावे यासाठी मी वाचतो आहे... वाचीत राहणार आहे!

कुणी मानो या न मानो; पण माझे तरी स्वानुभवावरून स्पष्ट मत बनले आहे की, माणसाच्या मन, मेंदू आणि मनगटाला उभारी आणण्यासाठी कधीही उपयुक्त ठरेल असे वाचन हे खरे-खुरे असे सत्त्वच आहे. निरामयपणाचे जीवन जगण्यासाठी जसे निर्मळ, स्वच्छ, शुध्द जीवन तसेच आपल्याला यशस्वीपणाचे जीवन जगण्यासाठी वाचन हे पूर्णब्रह्म स्वरूप इष्टान्न आणि मिष्टान्न आहे. म्हणून समस्त साक्षर सान-थोरांनी वाचन संस्कृती स्वीकारावी. स्वहितास्तव, 'वाचाल तर वाचाल' हे सांप्रतकालीन जगाचे आणि युगाचे घोषवाक्य आहे. त्याचा मथितार्थ लक्षात घेऊन प्रत्येकाने जगण्यासाठी... म्हणजे प्रगतिकारक जीवन जगण्यासाठी वाचनाचा नैमित्तिक परिपाठ सुरू करावा... चालू ठेवावा.

ज्याप्रमाणे शिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे त्याप्रमाणे वाचन ही प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. किंबहुना शिक्षण आणि वाचन ह्या वेगवेगळ्या प्रक्रिया नसून एकच आहेत. मान आणि धड हे अवयव जसे वेगवेगळे करता येत नाहीत तसे वाचन शिक्षण ह्या दोन प्रक्रिया भिन्न करता येत नाहीत. कारण वाचल्याशिवाय विद्या नाही आणि विनाविद्या वाचन नाही. म्हणून जेव्हा 'नहि ज्ञानेनं सदृशं पवित्रमिह विद्यते ' किंवा 'विद्यैव परम् दैवतम्' असे म्हटले जाते तेव्हा त्या उक्तीत वाचन हा शब्दही असतो असे समजावे. माणूस हा आयुष्यभर विद्यार्थी... ज्ञानार्थी असतो. अर्थात त्याला जीवन भरचा वाचक असणे योग्यच आहे.

तात्पर्य असे की, वाचन ही कामधेनू आहे. वाचन कल्पद्रूम आहे... चिंतामणी आहे. राष्ट्रपिता म. गांधीजींनी पुस्तके म्हणजे मानवी मन निर्मळ करणारा साबण, असे म्हटले आहे. अर्थात अशा या पुस्तकांचे वाचन आणि पठण केले तर मानवी मन निश्चितच महन्मांगल्यमय होईल यात तिळमात्र शंका नाही.

मला हितोपदेश करावासा वाटतो की, मी वाचन करतो तसे आपणही जीवनाचे व्रत म्हणून पुस्तकांना जीवनसाथी मानून त्यांचे नित्य नियमाने वाचन करा. वाचनासाठी जास्तीत जास्त सवड काढा. आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन सुसह्य व्हावे व रहावे याकरिता वाचनसंस्कृतीचा अवलंब करा. वाचनाचा छंद लावून घ्या.

दिसामाजी एक तरी ओवी अनुभवावी या उक्तीप्रमाणे दिसामाजी एक तासभर तरी वाचन करावे असा संकल्प करून तो सिध्दीस न्या. घरी वाचनाची सुविधा नसेल तर, नियमितपणे वाचनालयात जाण्याचा उपक्रम सुरु करा. पुस्तकालये ही खरीखुरी देवालये आहेत. अशा श्रद्धेने वाचनालयात जाऊन नैमित्तिक पूजा-पाठ विधीप्रमाणे वाचन विधीचा अंगीकार करावा.

सांप्रतकाळी फ्लॅट संस्कृती आणि रात्रदिन टी.व्ही. पुढे बसण्याची प्रवृत्ती यामुळे ज्याला त्याला वाचन ही विकृती वाटू लागली आहे. परिणामतः असे सामाजिक चित्र प्रदर्शित होते की, वाचनालये ही सताड उघडी ठेवूनही ती रिकामीच दिसतात. पण कारागृहे ही रात्रंदिवस बंद असताही ती हाऊसफुल्ल असतात. म्हणून मला तरी असे वाटते की ही मानवी विकृती कमी व्हावी यासाठी वाचन संस्कृती विकसित होणे ही विद्यमन काळाची गरज आहे आणि याकरिता शासनाने 'गाव तिथे वाचनालय'असे आदर्शाप्रत नेणारे अभियान राबवावे. तसेच गावोगाव ग्रंथमंदिरे उभी करावीत. कदाचति माझ्या या संभाव्य योजनेचा हे अभियान राबवले तर फार फायदे होतील. गावोगावं 'मी वाचतो' म्हणणाऱ्यांची एक टीम तयार होईल आणि खऱ्या अर्थाने आपण साक्षर महाराष्ट्र समर्थ महाराष्ट्र महान महाराष्ट्र हा आदर्श भारतासाठीही अत्यंत उपयुक्त असल्याचे सर्वसामान्य करू, किंबहुना तो सर्वत्र मान्य करावयाच लागेल असे सामर्थ्य या वाचन प्रवृत्तीचे आहे. यास्तव 'मी वाचन करतो ' एशी उक्ती आणि कृती करणाऱ्यांची घरटी चळवळ व्हायला हवी. म्हणजे सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील त्याचे या उक्तीची प्रचिती येईलच.

तात्पर्य असे की, वाचन हे सुसंस्कृतीचे लक्षण, सुसंस्काराचे शिक्षण आणि मन व मति यांचे संभाषण आहे.

श्रद्धापूर्वक वाचन उपासनेने माणूस दुराचरण करण्यापासून परावृत्त होऊ शकतो. त्याचे चंचल मन एकाग्र होते. तो काम, क्रोध आदी विकारांवर ताबा ठेवू शकतो. ज्यांना कोऽहम् असा प्रश्न पडतो, अशांना आत्मज्ञान आणि किंकर्तव्य मूढा. अशा संभ्रमित जनासः आत्मसाक्षात्कार करून देण्याचे सामर्थ्य वाचनात आहे. जीवनाला चांगली कलाटणी देण्याचे सामर्थ्य वाचनालयात आहे. जेव्हा चित्त विचलित होते तेव्हा वाचन अत्यंत उपयुक्त ठरते.

असे म्हटले जाते की, तन उदकाने शद्ध होते. मन सत्याने शुद्ध होते व बुद्धी वाचनाने शद्ध होते (बुद्धी पठणेन शुद्धतिः)

असेही म्हटले जाते की कोकिळेचे सौंदर्य तिच्या सुस्वर गायनात आहे, स्त्रीचे सौंदर्य तिच्या पावित्र्यात आहे, कुरुप माणसाचे सौंदर्य त्याच्या विद्येत आहे आणि विद्येचे सौंदर्य वाचनात आहे.

तसेच हे ही सत्य आहे की, क्रोधाला क्षमाशीलतेने जिंकता येते, दुष्टपणाला सौजन्याने जिंकता येते, असत्याला सत्याने जिंकता येते पण स्वतःला वाचनाने जिंकता येते. इतकेच नव्हे तर क्रोध, दुष्टता, असत्यपणा या अशा अनेक दुर्गुणांवर वाचन हा रामबाण उपाय आहे. उगीच नाही म्हटले की जो जग जाणतो तो विद्यावान आणि जो स्वतःला जाणतो तो आत्मज्ञानी. जो इतरांना जिंकतो तो अजिंक्य. म्हणून स्वतःला जाणण्यासाठी व जिंकण्यासाठी समस्त साक्षर, सुविचारी, सुहृदय, समंजस सुजनांनी तरी सामंजस्यपणे वाचनवेडे व्हावे.... रसिक वाचक व्हावे आणि " आपलिया यत्ने करावा आपुला उद्धार" होय! मी वाचन करतो तो यासाठीच! "याच साठी करितो मी नित्य वाचन- जीवन माझे सदा तणाव मुक्त रहावे !"

"वाचकांना शुभं भूयात"

**एम्. एन् म्हात्रे**

वडगांव-पेण, जि. रायगड.

# शिक्षण - एक चिंतन

*शिक्षणासंबंधी व शिक्षण संस्थासंबंधी काही विचार यालेखात मांडण्यात आले आहेत. - संपादक*

ब्रिटीश अमदानीत या देशात एतद्देशीय शाळा होत्या. शाळांमध्ये निश्चित अभ्यासक्रम नसे व धर्माच्या तत्वानुसार (हिंदू मुसलमान) त्या चालत. परंतु पुढे ब्रिटीश राजवटीच्या व मिशनरी शिक्षण-संस्थांच्या प्रभावाने इ.स. १८२७ साली नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली व खाजगी शाळांना प्रारंभ झाला व हळूहळू माध्यमिक, प्राथमिक, महाविद्यालयीन स्तराच्या खाजगी शाळा सुरू झाल्या. आरंभीच्या काळात सरकारी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे फोफावली पण नंतर जसजशी मागणी वाढली तशा खाजगी संस्था अस्तित्वात आल्या. शिक्षणात खाजगी संस्थांचा असा सहभाग फार वर्षांपासून आहे.

भारताच्या ज्ञानसाधनेची परंपरा ४-५ हजार वर्षांची असून या देशात तत्वज्ञान, धर्म, न्याय, वैद्यक, ग्रह, तारे व इतर ललित साहित्य यावर अगणित ग्रंथसंपदा आहे. चित्रकला, नृत्य, संगीत याचीही प्रगती नेत्रदीपक आहे तरीही शिक्षणातील प्रगतीही सुखावह नाही. मानवतावादी अध्यात्मिक दृष्टीकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक बदल यांत भारतीय शिक्षणाला फार दूरचा पल्ला गाठायचा आहे व त्यादृष्टीने शैक्षणिक संस्थांचे या बाबतीत योगदान महत्त्वाचे ठरले.

समाजाची जडणघडण पुरातन कालापासूनच चालू आहे. त्यावर आर्थिक व राजकीय स्थित्यंतर, निसर्ग, परिसर, सर्वसामान्य शिक्षण याचा परिणाम होतो. कालबाह्य धार्मिक सामाजिक आचारविचार प्रयत्नपूर्वक टाळले पाहिजेत. एकसंध समाज निर्माण करण्याची नितांत आवश्यकता असून शिक्षण संस्थांनी विचारपूर्वक शिक्षण व समाजप्रबोधन करावयास हवे.

शासनाच्या अनेक नव्या नियमांमुळे संस्था चालकांचे स्वातंत्र्य कमी झाले आहे व शिक्षणक्रियेत साचेबंदपणा आला आहे व त्यामुळे नवे प्रवाह निर्माण करणे आवश्यक ठरत आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक विषमता दूर करणे, कनिष्ठ मध्यम वर्गातल्या आणि प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतल्या मुलांच्या शैक्षणिक गरजांसाठी विद्यार्थी सहाय्यक सभा, अभ्यासिका, पूरक आहार योजना इ. शिक्षणसंस्थानी लक्ष घालण्यासारख्या अनेक योजना आहेत. ज्ञान नेहमीच अनुभवजन्य असते. त्यामुळे मुलांना वैयक्तिक व सामुदायिक कृती प्रकल्पांच्याद्वारे शिक्षण देणे सहज शक्य आहे. परंतु सर्व विचारसरणी मंद झालेल्या काळात आपण सध्या जगत आहोत.

पूर्वजांकडून मिळालेल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा, मूल्यांचा, श्रद्धासमजुतींचा म्हणजेच संस्कृतीचा वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोचवण्याचे त्यायोगे वारसा जतन व संपन्न करण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. जेम्स कोलमन म्हणतात की, अशा विचारसरणी मानल्या गेलेल्या शिक्षणाकडे जग आता सर्व क्षेत्रांतल्या सर्व प्रकारच्या बदलांची गुरुकिल्ली म्हणून पहात आहे.

भारतातील प्रचलित शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम,

अध्यापक, अध्यापन पध्दती यांजकडून राष्ट्रीय संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन होईल असे वाटत नाही व ज्या वैश्विक संस्कृतीच्या बदलत्या संदर्भात ते करावयाचे ती क्षमता व जाणीवही आजच्या आपल्या शिक्षण पद्धतीत नाही. यासाठी शिक्षण संस्थांना शिक्षण समाजसन्मुख कसे होईल, समाजाच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची क्षमता शिक्षणात कशी येईल, तसेच कठोर समाज विचक्षणा हा अभ्याक्रमांचा गाभा कसा बनवावा लागेल यावर प्रयत्न करणे जरुर आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून गरीब मुलामुलींच्या विकासासाठी, त्यांच्या जगण्याला अर्थ देण्यासाठी थोडक्यात त्यांची जीवने फुलवण्यासाठी काही संस्था आधीच कार्यरत आहेत. 'तमसो मां ज्योतिर्गमय।' हेच शिक्षणाचे मंगलमय व पवित्र असे कर्तव्यकार्य असावे.

आज जीवनाभिमुख शिक्षणाची गरज आहे. साऱ्या मानवजातीवर प्रेम निर्माण करण्याची हृदये विशाल बनवायची जरुरी आहे. खरी लोकशाही राज्यपद्धती ही शेवटी आंतरराष्ट्रीय दर्शननिर्मितीस कारणीभूत होते. आज जगास आधुनिक पद्धतीच्या समाजरचनेची शैली निर्माण करावयाची आहे.

आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सहकार निर्माण करायला उपयुक्त अशी खरी देशभक्ती समाजाला शिकवणे जरूर आहे. योजनाबद्ध शिक्षण नवराष्ट्र निर्माण करु शकेल आणि राष्ट्रीय प्रेरणास्त्रोत एका निश्चित ध्येयाकडे वळविता येईल.

डॉ. वॉल्टर ल्यूईस म्हणतात 'आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणात आपणांस जगातील सर्व भागातील जनतेत महत्वाकांक्षा निर्मिण्याचे, जीवनमूल्ये रुजविण्याचे व जीवनपद्धतीचे आकलन करुन घेण्याच्या शक्तीचे वर्णन करावयाचे आहे.' 'स्वत:इतकेच शेजाऱ्यावर प्रेम करायला शिका' ही येशू ख्रिस्ताची शिकवण जनमानसावर बिंबवली पाहिजे. यासच 'वसुधैव कुटुंबकम्।' वा 'जयजगत' असे म्हणतात.

प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीयतेचे सम्यक ज्ञान प्राप्त करुन द्यावयाची संधी शिक्षण संस्थांनी मिळवून दिल्यास शिक्षण हेतू सफल होईल. सम्यक ज्ञान म्हणजे जगातील विविध राष्ट्रांच्या वा देशांच्या जनतेचा, तयांच्या रीतिरिवाजांचा, त्यांच्या, प्रथांचा, तत्वज्ञानांचा व इतिहासाचा व जगाच्या इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण स्थानाचा परिचय करुन देणे.

'शिक्षणाचे आणि अध्यापनाचे शास्त्र' या श्री. जयकुमार ज्ञा. आळंदकर यांच्या पुस्तकात दिलेल्या अध्यापनपद्धतींच्या खालील सूत्रांचाही शिक्षण देणाऱ्या संस्थांनी कोणतीही योजना राबविताना विचार करावा. अध्यापन कसे असावे?

१. ज्ञातांकडून अज्ञाताकडे चला,
२. मूर्ताकडून अमूर्ताकडे चला,
३. सोप्याकडून उवघडाकडे चला,
४. साध्याकडून संमिश्राकडे चला,
५. अनुभवातून तर्कशुद्धतेकडे चला,
६. पूर्णाकडून भागाकडे चला,
७. अनिश्चिताकडून निश्चिताकडे चला,
८. विशेषाकडून सामान्याकडे चला,
९. सामान्याकडून विशेषाकडे चला,
१०. निसर्गाच्या मार्गाने चला,
११. पृथ्थकरणातून संयोजनाकडे चला

असे असावे.

शिक्षणविषयक सनद शिक्षणाविषयी आणि कार्यक्रमाविषयी काय म्हणते हे ही विचार करण्यासारखे आहे.

'शिक्षण सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन झाले

पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षणाचा राष्ट्रीय विकासाशी घनिष्ट संबंध प्रस्थापित करायला हवा. तसेच ते जनताभिमुखही व्हायला हवे कारण अजूनही फार मोठा भारतीय समाज दारिद्र्य रेषेखालील जीवन व्यतीत करतो आहे. त्यामुळे शिक्षणाने या लोकांमध्ये नवी आत्मजाणीव निर्माण केली पाहिजे.'

**खालील एकसंघ कार्यक्रम तातडीने सुरु करुन त्याची लगेच कार्यवाही व्हायला हवी.**

१. सर्व पातळ्यांवरील सर्व शिक्षणसंस्थेच्या एकूण कार्यवेळापैकी एक तृतीयांश ते निम्मावेळ समाजसेवेच्या आणि राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी खर्च झाला पाहीजे.

यांत संस्थांमधील शिक्षक, विद्यार्थी आणि इतर कर्मचारी यांनी भाग घ्यावा. शारीरिक श्रमाचे कामही राहील. निरक्षरता - निर्मूलनासह प्रौढशिक्षण, १५ ते२५ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या युवकांचे अनौपचारिक शिक्षण आणि प्राथमिक किंवा शाळापूर्व शिक्षणाचा प्रसार यांच्यावर भर दिला पाहिजे.

२. सध्याच्या शैक्षणिक संरचनेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर अनौपचारिक शिक्षण विकसित करणे ही, सुधारणा तातडीने करायला हवी.

३. उपेक्षित वर्गांना शिक्षणाचा संपूर्ण लाभ मिळालाच पाहीजे.

४. उच्चशिक्षित विद्यार्थ्यांनी परदेशी स्थायिक होण्याची अपप्रवृत्ती थांबविण्यासाठी माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवरील शिक्षणाबाबत मूलगामी धोरण निश्चित केले पाहिजे.

५. शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केवळ पैसा पुरेसा ठरत नाही. सतत परिश्रम, सुयोग्य वातावरण आणि संपूर्ण जगणे उचित मूल्यांची जोपासना यांचीही तितकीच गरज आहे.

प्रशासन पद्धती अशी हवी की योग्य दिशेने प्रत्येक संस्थेला स्वत:च्या व समाजाच्या विकासाची योजना तयार करण्यास उत्तेजन आणि मार्गदर्शन मिळेल.

संस्थात्मक नियोजनाची पद्धत स्वीकारणं हे गुणात्मक शैक्षणिक सुधारणांच्या दृष्टीने पहिले पाऊल आहे. सध्या बहुतेक नियोजन राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरुन केले जाते.

नियोजनाची प्रक्रिया व्यापक करुन संस्थानिहाय योजना आखण्याची आणि अंमलात आणण्याची पद्धत स्वीकारली पाहिजे. कारण याच पातळीवर शिक्षणाच्या नियोजनबद्ध विकासामध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक सहभागी होऊ शकतात. या संबंधामध्ये शिक्षण आयोगाने खालीलप्रमाणे म्हटले आहे.

'प्रत्येक शिक्षण संस्थेने चांगले नियोजन आणि अधिक कष्ट केले तर तिच्यापाशी उपलब्ध असलेली साधनसामग्री कितीही मर्यादित असली तरी तिला शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे शक्य आहे. म्हणून शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी भौतिक साधनांवर भर देण्याऐवजी या क्षेत्रात कार्य करीत असलेल्या व्यक्तींना, परस्पर सहकार्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करायला उद्युक्त करणे अधिक महत्वाचे आहे. कारण भौतिक साधनांची उणीव हे प्रयत्न निश्चित भरुन काढू शकतील. भौतिक साधनांची उणीव असतानाही मानवी प्रयत्नांच्या बळावर शिक्षण संस्थांना हाती घेता येतील असे अनेक कार्यक्रम आहेत. त्यांतील काही असे : विद्यार्थ्यांचे अनुत्तीर्ण आणि गळती होण्याचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न, अध्यापन पध्दतीत सुधारणा, मंद बद्धीच्या मुलांना मार्गदर्शन, बुद्धिमान मुलांकडे विशेष लक्ष, अभ्यासक्रमात समृध्दता, कार्यपद्धतीमधी नव्या तंत्रांचा प्रयोग, शाळेतील शैक्षणिक कार्यक्रम संघटित करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा आणि

स्वाध्यायाचा अवलंब करुन शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ अशा कार्यक्रमांमध्ये नियोजन आणि कार्यवाही महत्त्वाची असते.'

गुणवत्ता सुधारणेच्या कार्यक्रमासाठी काही पैसा खर्च करावा लागतो. पण तो थोडाच गुंतवावा लागेल कारण या कार्यक्रमांची यशस्विता मानवी प्रयत्नांवर, सखोल शैक्षणिक जाणिवेवर, सक्षम, कष्टाळू आणि समर्पित वृत्तीचे शिक्षक, सद्हेतूने प्रेरित झालेले, विद्याप्रेमी आणि निष्ठावान विद्यार्थी, शिक्षणासंबंधी आस्था बाळगणारे, सहकारी वृत्तीचे आणि उत्साही पालक अशा दृढ मानवी प्रयत्नांवर अवलंबून आहे. सखोल बौद्धिक जाणिवेशिवाय अभ्यासक्रमात सुधारणा करणे, चांगल्या दर्जाची पाठ्यपुस्तके निर्माण करणे, अध्यापनाच्या गतिशील पध्दती स्वीकारणे, परीक्षा पद्धतीत सुधारणा घडवून आणणे, स्थानिक परिस्थितीशी शिक्षण निगडित करणे, परस्पर सहकार्याच्या भूमिकेवरुन शाळा आणि समाज यांना एकत्र आणणे, यापैकी काहीही शक्य होणार नाही. समर्पित वृत्तीने परिश्रम करणाऱ्या आणि बौद्धिक आशय ओतणाऱ्या वातावरणाचाच नेमका अभाव आहे आणि म्हणून जोपर्यंत आपण असे अनुकूल वातावरण निर्माण होत नाही तोपर्यंत कितीही पैसा ओतला तरी शिक्षणाची गुणवत्ता वाढणे सर्वस्वी अशक्य आहे.

संस्थानिहाय योजना तयार करण्यासाठी योग्य अशा तंत्रांचा विकास करणे आवश्यक आहे. संस्थांच्या योजनांना केवळ मागण्यांच्या खालची अवकळा येईल आणि त्या पूर्ण करणे कोणत्याही शासनव्यवस्थेच्या शक्तीबाहेरचे होईल. हे टाळण्यासाठी दक्षता घ्यावी लागेल. संस्थानिहाय योजना या 'कृतिमूल कार्यक्रम' म्हणून तयार कराव्या लागतील आणि आज उपलब्ध असलेल्या साधनांच्या बळावर किंवा व्यावहारिक दृष्ट्या शक्य अशा आणखी मिळणाऱ्या साहाय्यावर शाळांना त्या हाती घेता येतील.

भारतीय शिक्षण आयोगाच्या दृष्टीने शिक्षणाची खाली नमूद केलेली सहा उद्दीष्ट्ये आहेत. जी शैक्षणिक संस्थांना त्यांच्या योजनांचा विचार करताना दुर्लक्षिता येणार नाहीत.

**१. लोकशाही नागरिकत्व:** यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव अपेक्षित आहे.

**२. व्यक्तिमत्त्वाचा विकास:** यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक व भावनात्मक विकासाचा समावेश आहे.

**३. उत्पादन क्षमता:** यामध्ये शेती व उद्योगधंदे यातील उत्पादन क्षमतेला महत्त्व दिले आहे.

**४. सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता:** यामध्ये देशातील भाषा, प्रदेश, रूढी, धर्म यांच्या भिन्नतेत अभिन्नता पहाणे अपेक्षित आहे. तसेच समूह शाळा पद्धती, सामाजिक व राष्ट्रीय सेवांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव, राष्ट्रीय विवेकाची जणीव निर्माण करणारे उपक्रम, इतिहासाचे राष्ट्रीय एकात्मतेस उपयुक्त असे अध्यापन याचा स्वीकार शैक्षणिक सांचातून स्वयंप्रेरणेने कसा होईल हे पाहणे.

**५. आधुनिकता :** कालबाह्य झालेली मूल्ये टाकून नवीन मूल्ये स्वीकारण्यास विद्यार्थ्यांची मनोरचना तयार करणे, शिक्षण व्यवस्थेतून कुतूहल, जागृती, योग्य अभिरुचीची वाढ, स्वावलंबन व निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांना वाढेल हे पाहिले पाहीजे.

**६. शैक्षणिक क्रांती :** यामध्ये राष्ट्रीय विकास व भरभराट याचा अतूट आंतरिक संबंध आहे हे जाणून शिक्षणाच्या आकृतिबंधात आमूलाग्र परिवर्तन आवश्यक आहे व शिक्षणाकडे पाहण्याच्या परंपरागत दृष्टिकोनातही आमूलाग्र परिवर्तन आवश्यक आहे. शैक्षणिक दर्जा व

वाढ यासाठी शैक्षणिक क्षेत्रात क्रांती हे उद्दिष्ट आवश्यक आहे.

शेवटी सर जॉन अँडम्स म्हणतात त्याप्रमाणे 'शिक्षण ही आमरण चालणारी प्रक्रिया आहेत' व त्या प्रक्रियेची १) नैसर्गिक व स्वयंस्फूर्त प्रक्रिया २) अखंड प्रक्रिया ३) ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक पातळीवर चालणारी प्रक्रिया ४) अव्यय प्रक्रिया म्हणजेच प्रक्रियेद्वारे होणारे समायोजन नेहमीच इष्ट, सुयोग्य व प्रगतीपर असेल असे नाही. ५) सहेतुक व जीवपूर्वक प्रक्रिया ६) प्रक्रियेचा हेतू विद्यार्थी अनुभवसंपन्न व सुसंस्कारीत व्हावा. अशी सहा वैशिष्टये असून शिक्षणाच्या मानसशास्त्रीय अधिष्ठानाप्रमाणेच समाजशास्त्रीय अधिष्ठान यावर ते भर देतात. मानसशास्त्रीय अधिष्ठानात शिक्षक व विद्यार्थी यांच्या संबंधाचा विचार आहे. यात विद्यार्थ्यांचा स्वभाव, स्वभावाचे स्वरुप, वर्तन व शक्ती याचा अभ्यास अभिप्रेत आहे. शिक्षणाच्या समाजशास्त्रीय अधिष्ठानात विद्यार्थी ज्या समाजजीवनात जन्मतो, वाढतो, विकास पावतो व जगतो त्याचा विचार केला जातो. माणूस तो जे जीवन जगतो त्या समाजजाणिवेत समरस झाल्यानेच खरे शिक्षण शक्य आहे. व्यक्तीचे शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

उच्च नैतिक दर्जाचे नेतृत्व, कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ, व्यवसाय व औद्योगिक क्षेत्रातील जाणकार कोणत्याही राष्ट्राला उच्च पण कसदार शिक्षणातूनच मिळतात व त्यादृष्टीने शैक्षणिक दर्जा व वाढ या दोन्हीत समन्वय साधणारी शिक्षण पद्धती अस्तित्वात येणे आवश्यक आहे व या कार्यात शैक्षणिक संस्थांचे फार मोठे योगदान आवश्यक आहे.

**दत्तात्रय गुरव**
चिंचपोकळी
मुंबई

## तुमच्या माहितीसाठी

- भारतात एकाच थिएटरात सर्वाधिक काळ चाललेली फिल्म होती 'शोले'. मुंबईतील ग्रँट रोड विभागात असलेल्या मिनर्व्हा चित्रपटगृहात हा चित्रपट सतत चार वर्षे दाखवला जात होता.

- १५ व्या शतकातील महान चित्रकार लिओनार्डो-द-विन्सी यांना हेलिकॉप्टरची कल्पना पहिल्यांदा सुचली होती. त्यानंतर थेट १९४० मध्ये आयगार क्रिसोस्कीने पहिले हेलिकॉप्टर बनविले होते.

- १९२० मध्ये जॉन्सन आणि जॉन्सन कंपनीचे कर्मचारी अर्ली डीकन्स याने बँड एड पट्टीचा शोध लावला होता. कारण त्याच्या पत्नीला अधूनमधून इजा होत असे. आपला हा शोध त्याने कंपनीला कळवताच कंपनीने तो स्वीकारला होता.

- श्वास रोखून आत्महत्या करणे शक्य नाही. जास्तीत जास्त संबंधित व्यक्ती बेभान होऊ शकेल. कारण फुफुसे स्वत:हूनच आपले काम सुरू ठेवतात.

- १८ व्या शतकात फ्रान्समध्ये २३ इंच उंची असलेल्या एका व्यक्तीला 'सिक्रेट एजंट' म्हणून नेमण्यात आले होते. फ्रान्सच्या उत्क्रांतीच्या वेळी रिचेबोर्ग नावाच्या या व्यक्तीला नर्सद्वारा पॅरिसच्या आत-बाहेर नेण्यात येत असे आणि त्याच्याबरोबरच अनेक गुप्त गोष्टींची ने-आण करण्यात येत असे.

- 'पे टेलिफोन' (पैसे देऊन टेलिफोन करणे) पद्धतीत सुरूवातीला फोन करणाऱ्याला यंत्रात पैसा टाकावा लागत नव्हता. तर बाजूलाच उभ्या असणाऱ्या कर्मचाऱ्याला तो द्यावा लागत होता. कॉईन टेलिफोन १८९९ नंतर बाजारात आला.

# शालेय शिक्षण - व्याख्यांच्या संदर्भात

*शाळेच्या वयात व्यक्तिमत्वाची जडणघडण होणे यावर अनेक मान्यवर शिक्षण तज्ज्ञांनी आपल्या लेखनात, विचारमंथनात भर दिला आहे. मूल अमूक एक वर्षाचे झाले की त्याला शाळेत अडकवायचे, इतका कोरड्या कर्तव्य बुद्धीने विचार करण्याचा हा विषय नाही. शिक्षण तज्ज्ञांच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर आपण शालेय वयातील मुलांच्या मनाचा विचार करावयास हवा. या दृष्टीने हा लेख! - संपादक*

## शिक्षण - काही व्याख्या

शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये अनुभवी, शिक्षित अशा अध्यापकांकडून अननुभवी विद्यार्थ्यांना शिकविले जाणे, त्यांच्यातील कौशल्यांचा विकास होणे अशा प्रक्रियेचा समावेश आहे. काळाच्या संदर्भात या प्रक्रियेमधील पद्धती बदलत गेल्या असल्या वा प्रगत झाल्या असाल्या तरी मूळ हेतू बदललेला नाही. शिक्षणाच्या असंख्य अशा व्याख्या असंख्य शिक्षण तज्ज्ञांनी, समाज शास्त्रज्ञांनी केलेल्या आढळतात. त्यापैकी काही प्रातिनिधिक ठराव्यात अशा व्याख्या येथे उद्धृत केल्या आहेत.

### १) स्वामी विवेकानंद -

जगप्रसिद्ध भारतीय तत्वज्ञ स्वामी विवेकानंद यांच्या मते, शिक्षण हे मनुष्यातील चांगले जीवन जगण्याच्या शक्यता वाढवू शकेल असे साधन आहे. मोजक्या शब्दात व्याख्या करताना ते म्हणतात, "Education is the manifertation of the perfection already in man." या व्याख्येबरोबर त्यांनी सांगितलेले आठ हेतू शिक्षण या संकल्पनेवर अधिक प्रकाश टाकणारे आहेत. ते हेतू पुढीलप्रमाणे:-

a) Education for Character Building

b) Education for making people self Reliant

c) Education for develping spiritual life.

d) Education for serving Humanity.

e) Education for develping and feeling of Bratherhood.

f) Education for develping spirt of Reunciation

g) Education for attaining self suffience

h) Education for Physical development.

### २) रविन्द्रनाथ टागोर -

शांतिनिकेतन या संस्थेच्या माध्यमातून आश्रम पद्धतीच्या शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार करणारे थोर साहित्यिक विचारवंत गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर यांनी शिक्षणाचा अन्वयार्थ लावताना व्याख्यारुपात मांडण्याचा जो प्रयत्न केला तो असा "Education is nothing short of the highest purpose of man. The bullest growth and freedom of the soul"

### ३) महात्मा गांधी -

मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेते महात्मा गांधी यांनी केलेली व्याख्या अशी आहे, "By education I mean an allround drawing out of the best in child and man-body mind and spirit"

### ४) आर.एन.जोशी -

ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ व जागतिक शिक्षण पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करणारे विचारवंत R.N.Joshi आपल्या पुस्तकात म्हणतात, "Education helps a

parson in the unfolding of his personality by bringing forth and revealing the potential qualities in him. It develops the mind the physique, the senses and the skills and nourishes the thinking qualities of the learner. It affords a means for a parson to earn his livlihood. and also serve The society in several ways" (Education aswhere and here: R.N.Joshi: Bhavriya Vidya Bhavan, Bombay: 1979:p)

## शालेय शिक्षण

या व्याख्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशामधील एकूण शिक्षण पद्धतीमध्ये ज्या तऱ्हेने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते त्याकडे दृष्टिक्षेप टाकला असता अनेक प्रकारची निरीक्षणे आपल्या ध्यानात येतात. विद्यार्थी महाविद्यालयाच्या उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत येण्यापूर्वी शालेय स्तरावर दिले जाणारे शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील अनेक वर्षे व्यापणारे असते. आयुष्यातील महत्त्वाची अशी १०-१२ वर्षे ज्या शिक्षण प्रक्रियेचा विद्यार्थी भाग असतो, त्या प्रक्रियेतून मूलभूत स्वरूपाची अनेक कौशल्ये विद्यार्थ्यांत विकसित होणे अपेक्षित असते.

शालेय जीवनात पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक अशा स्तरांवर विद्यार्थ्यांचे आज दिसणारे चित्र कसे आहे? संस्कारक्षम अशा या वयात विद्यार्थ्याला भेटणारे शिक्षक त्या शिक्षकांशी विद्यार्थ्यांचे असणारे संबंध, शाळेमध्ये अपेक्षित असणारे आश्वासक वातावरण शालेय मित्रांचे विश्व या सर्व घटकांच्या वागण्याची अशी एक चाकोरी निर्माण होते की या टप्प्यावरील शिक्षणप्रक्रियेत एक प्रकारचा आपलेपणा, कौटुंबिक जिव्हाळा यांचा अनुभव विद्यार्थी नकळत घेत असतो. वय लहान असल्याने एकूण जगाविषयीच्या त्याच्या कल्पना स्पष्ट झालेल्या नसतात. त्याच्यामधील कौशल्ये अविकसित असतात. प्रत्येकाचे म्हणून वेगळे व्यक्तिमत्त्व असले तरी त्या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे स्पष्ट झालेले नसतात. व्यक्तिमत्त्वास आकार आलेला नसतो. घर सोडून आई वडीलांपासून जरी आपण लांब झालेलो असलो तरी शाळेतील शिक्षक आपले आहेत अशी भावना मनात असते. बरोबरीच्या मित्रांच्या अस्तित्वाचा एक आधार नकळत मनात असतो. त्यामुळे शाळेचे जग हेच काय ते खरे जग असे विद्यार्थ्यांस वाटत असते. शिक्षकांचे आपल्याकडे लक्ष आहे या एक भावनेमुळे एक प्रकारची सुरक्षिततेची जाणीव मनता असते. अगदी प्राथमिक स्तरावर, विद्यार्थी अनुकरणशील असतो तेव्हा शिकविणाऱ्या शिक्षिका म्हणजे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सर्वेसर्वा असतात. याचे कारण त्या शिक्षिकेमध्ये विद्यार्थी नकळत आपली आई शोधीत असतो, अनुभवीत असतो. प्राथमिक स्तर संपून माध्यमीक स्तरावर विद्यार्थी येतो तेव्हा त्याच्यातील अनुकरणशीलता थोडी कमी होते तरीसुद्धा आपली शाळा, शाळेचे एकूण जग यांच्याशी विद्यार्थी मनाने बांधलेला असतो. शाळा हा त्याच्या अभिमानाचा विषय असतो.

या शालेय शिक्षणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतात

१) किमान कौशल्ये आत्मसात करून घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची जडण-घडण करणे. ही कौशल्ये तरी का विकसित करावयाची, तर एक वा अधिक भाषांचे मूलभूत ज्ञान मिळविणे व त्या आधारे इतर जीवनावश्यक अशा विषयांचा गाभा समजावून घेणे हे यामागील प्रमुख कारण आहे. भाषा हे संदेश वहनाचे, तसेच अभिव्यक्तीचे प्रमुख असे माध्यम असल्यामुळे विद्यार्थ्यातील भाषिक कौशल्यांचा विकास शालेय वयात योग्य तऱ्हेने होणे गरजेचे असते. यातूनच माध्यमिक स्तरावर म्हणजे शालेय वयातील शेवटच्या तीनचार वर्षात विषय विशेषीकरणाचा अभ्यास करण्याचे कसब विकसित करावयाचे असते. या सर्वातून विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची पूर्वतयारी साधणे हा महत्त्वाचा हेतू असतो. उच्च शिक्षणाच्या टप्प्यावर आल्यावर विद्यार्थ्यांचे व्यावसायिक वा इतर

अभ्यासकांकडे वळण्याचे मार्ग तयार होतात.

२) शालेय शिक्षणाचा दुसरा प्रमुख हेतू म्हणजे ज्या समाजात वातावरणात विद्यार्थी लहानाचा मोठा होतो वाढतो त्या समाजाबद्दलची त्याच्या मनातील जाण वाढविणे. यामुळे त्या समाजामध्ये तो विद्यार्थी क्रियाशील होऊ शकतो.

३) या सर्व प्रक्रियेबरोबरच शालेय शिक्षणाचा आणखी एक हेतू आहे तो म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात नैतिक मूल्यांची जोपासना करुन त्या अनुषंगाने त्याला त्याचे चारित्र्य, व्यक्तिमत्त्व घडविण्यास मदत करणे. अशी मदत मिळाल्यामुळे विद्यार्थी समाजात आपल्या पुढील जीवनामध्ये चांगला नागरिक म्हणून राष्ट्रीय विकासातील आपली भूमिका पार पाडेल.

शालेय शिक्षणाची गरज काय व व्यक्तिमत्त्व विकासात ते महत्त्वाचे साधन कसे याचा उलगडा हे हेतू नीटपणाने अभ्यासल्यास होऊ शकतो. या वयात विद्यार्थ्यांवर समाजातील इतर घटकांचाही कमी अधिक परिणाम होत असतो व त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाला हे घटकही कारणीभूत ठरत असतात.

**व्यक्तिमत्त्वावर इतर घटकांचा प्रभाव**

या इतर घटकांमध्ये अनेक घटकांच्या यादीचा समावेश होईल. आई-वडील व भावंडे, घरातील इतर नातेवाईक यांच्या सहवासात दिवसाचा सर्वाधिक वेळ विद्यार्थी असतो. घरातील सामाजिक आर्थिक स्थिती त्या घरातील वातावरण बनवीत असते. या सर्वांचा व्यक्तिमत्त्वाच्या घडण्या बिघडण्यावर मोठा परिणाम होत असतो. अनुकरणशीलता हे या वयाचे वैशिष्ट्यअसते. त्यामुळे घरातून मिळणाऱ्या अनेक गोष्टी विद्यार्थी त्याच्या नकळत टिपत असतो. घराबरोबरचा शाळेतील मित्र बाहेरील मित्र यांचा सहवास, वर्गशिक्षक वा विषय शिक्षक, शेजारी या सर्वांच्या सहवासातून विद्यार्थी घडत असतो. यांत्रिकीकरणातून निर्माण होणारी दूरदर्शनसारखी माध्यमे, अवकाश क्षेत्रातील प्रगतीच्या घडामोडी यांचाही त्याच्यावर प्रभाव पडत असतो.

या सर्वांतून नकळत जगाविषयीच्या कल्पनांना विद्यार्थी आकार देत असतो. त्याच्या कुवतीप्रमाणे तो चांगले वाईट ठरवू पहातो, निर्णयक्षमता विकसित करू पहातो. खेळांसारख्या माध्यमातील सहभागातून त्याच्यावर सामाजिकीकरणाची प्रक्रियाही घडत असते.

हे सर्व जरी खरे असले तरी या जडणघडणीच्या काळात व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला उपयुक्त ठरू शकणाऱ्या ग्रंथांसारख्या ज्ञानसाधनाचा, मैदानी खेळ, मनन चिंतन या मानसिक प्रक्रियांचा जितका हातभार लागायला हवा तितका लागत नाही. कारण आपल्या शालेय शिक्षणामध्ये व्यक्तिमत्त्वाच्या क्रियात्मक व भावात्मक अंगांचा जितका विचार केला जायला हवा तितका केला जात नाही. ज्ञानात्मक अंगावर नको तितका भर दिला जातो व त्यातून गुण मिळवीत पुढे सरकणे म्हणजे शिक्षण, पाठ्यपुस्कांचे वाचन किंवा पाठांतर म्हणजे वाचन अशा मर्यादित अपेक्षा वाढतात. शालेय जीवनात या क्रियात्मक व भावात्मक अंगांकडे लक्ष न पुरविले जाण्यामागे परीक्षांचा अतिरेक हेही कारण आहे. सत्र परीक्षा, अंतिम परीक्षा, अभ्यासबाह्य परीक्षा, गृहपाठ यांचा इतका ताण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडतो की त्याचा विकास योग्य तऱ्हेने घडूच शकत नाही. याबरोबरच गेल्या पन्नास वर्षातील आणखी एका समस्येचा येथे निर्देश करावासा वाटतो. ती म्हणजे लोकसंख्येचे अवास्तव केंद्रीकरण. लोकसंख्या केंद्रित होत गेली तशी शहरी संस्कृती वाढत गेली. शहरे वाढल्यामुळे रहात्या ठिकाणापासून शिक्षण व शाळेपासून घर या अवाजवी प्रवासाचा ताण विद्यार्थ्यांवर पडायला लागला. स्पर्धेच्या चुकीच्या कल्पनांतून

शिकवणी वर्ग, खाजगी शिकवण्या यांचे स्तोम वाढणे व त्यासाठी विद्यार्थी घड्याळाला बांधलेला राहू लागला या सर्व धावपळीचा मानसिक ताण विद्यार्थ्यांवर येत गेल्याने त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा योग्य अवसर मिळेनासा झाला आहे.

याखेरीज शिक्षण म्हणजे काय, ते कशासाठी दिले जाते याच्या पालकांच्या कल्पनाही धूसर असतात. खूप पैसा कमविणे या एका हेतूने प्रेरित झाल्यामुळे पालक आपल्या अपेक्षांचे ओझे विद्यार्थ्यांवर लादतात. यात व्यक्तिमत्त्वाच्या कल्पनेचा अति बाऊ करणारे पालक असतात तसेच स्पर्धेच्या चुकीच्या कल्पनांनी झपाटलेले पालकही असतात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अशा असंख्य ताणतणावांनी जखडलेले असल्याने त्याचा विकास, विकासाच्या कल्पना याबाबत एक प्रकारचा भांबावलेपणा शालेय स्तरावर आज आपल्याला दिसतो.

शिक्षणाच्या काही व्याख्यांचा उदाहरण दाखल वर उल्लेख केला आहेच. याशिवाय शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व शिक्षण म्हणजे आतून बाहेर येण्याची प्रक्रिया, स्वत्वाचा विकास करून स्वत:ला ओळखायला शिकवते ते शिक्षण या सुत्ररुप व्याख्या महत्त्वाच्या आहेत. शालेय संदर्भात तर असा विकास हेच शिक्षणाचे अंतिमसाध्य असले पाहिजे. ज्या शाळेच्या टप्प्या संबंधीचे हे विवेचन आहे त्या शाळेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आढळते "An Institution for instruction; also the building in which itis housed. The term 'school' is used for educational institution below the college level." (New standard Encyclopedia: Vol. 12: Standard educational corporation, Chicago:P.5-175)

मोहन पाठक

ठाणे

(पान क्र. १६ वरून)

**भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना**

निर्मित धर्म (Religion) करतात असाही एक "Hybrid Theological" मिश्रजातीय 'संकरज' शिखंडी धार्मिक दृष्टिकोन आहे.

<u>धर्म व संस्कारक्रिया</u> : हिंदू धर्म हा तुलनेने अपौरुषेय वैदीक ज्ञानावर व संकल्पनेवर आधारलेला आहे. त्यामध्ये कुठलेही धार्मिक किंवा राजकीय प्रॉफेटस् नाहीत.

त्यामुळे 'संस्कारक्रिया' ह्या धार्मिक आचार विचारात सामावल्या गेल्या, कौटूंबिक आचारविचार रुढी, परंपरा यांच्यात बांधल्या गेल्या व त्यामुळे त्या वंश परंपरा व धार्मिक आचारात युगानुयुगे प्रसृत झाल्या. रामायण, महाभारत, ह्यासारख्या काळांतही त्यांच्या ठळक खुणा आढळतात. पण ह्या कलीयुगात त्यांचा खऱ्या अर्थाने नाश झाला आहे.

जर समाजाला ह्या 'नोईडा' सारख्या प्रलय लक्षणी मानवी मूल्यांच्या अध:पातापासून वाचवावयाचे असेल, तर ह्या आपल्या सेक्यूलरवादी जिन्याने संस्काराची शिडी चढता येणार नाही कायदा, न्यायसंस्था, शिक्षणसंस्था ह्या भ्रष्टाचाराच्या गर्तेत अगोदरच प्राणांतिक अवस्थेत बुडताना दिसत आहेत.

संस्काराच्या योगीक, स्पिरीच्युअल व सत्य वैदिक पुनरुज्जीवन समाजाला सुसंस्कृत करण्याची गुरुकिल्ली आहे.

ह्या परिस्थितीची जितक्या लवकर जाणीव हिंदू समाजाला, भारताला व जगाला ह्याच क्रमाने होईल तितक्या प्रमाणाम व वेगातच जगाला नैतिक अध:पातापासून वाचवून संतमहर्षी,ऋषी व देवांनी दर्शवलेल्या Evolutionary उत्क्रांति पदावर आपली मार्गक्रमणा होईल.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५० Mbl : 9892046539
E-mail : yrsane@eth.net

# परिसर वार्ता

## डॉ.बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग

### होळी

शुक्रवार दि. २/३/२००७ रोजी पूर्व प्राथमिक विभागातील मोठा शिशु वर्गाची 'होळी' डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या प्रांगणात साजरी करण्यात आली. संध्याकाळी ७.०० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७.०० वाजेपर्यंत शाळेतच मुलांच्या राहण्याची व्यवस्था केली होती. शाळेच्या प्रांगणात खड्डा खणून होळी उभारुन भोवताली रांगोळी काढण्यात आली. रात्री ठीक ८.३० वा. माध्यमिकचे माजी शिक्षक श्री.प्र.ग. वैद्य सर यांच्या हस्ते होळीची पूजा झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांनी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून होळी पेटवली. "होळी रे होळी, पुरणाची पोळी" च्या गजरात मुलांनी आनंद व्यक्त केले. मग मुलांनी भरपूर नाचगाणी करुन व खेळून, पावभाजी व जिलबीवर यथेच्छ ताव मारला. मुले खूपच खूष होती.

रात्री ११.०० वा. आपापली अंथरूणे घालून मुले हसत-खेळत झोपी गेली व पहाटे लवकर उठून सर्व मुलांनी एक ग्लासभर दूध प्यायले. मग बाईंना अच्छा, करत सर्व मुले आपापल्या पालकांबरोबर घरी गेली. रात्री शाळेत राहिल्याची मजा आपल्या पालकांना सांगताना मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

### रंगात रंगली बालके.

रंगात रंगली बालक विद्यालंकार सभागृहात।

संस्काररूपी प्रेमाचे रंग उडवूनी रंगपंचमी केली जल्लोषात॥

होळीप्रमाणेच दि.९/३/०७ मुलांनी रंगपंचमी आनंदात साजरी केली. सर्व मुले रंगीत पाण्याच्या पिचकाऱ्या भरुन एकमेकांच्या अंगावर रंगीत पाण्याचे फवारे उडवीत होती. विद्यालंकार सभागृहातील रंगाने रंगलेल्या बालकांचे दृश्य अतिशय आकर्षक होते.

## सौ. आनंदीबाई जोशी विद्यालय

इ. ९ वी मध्ये शिकणाऱ्या आमच्या कु. ओजस गोहाड ह्या विद्यार्थीनीला 'मॅथमेटिक्स असोसिएशन, आय.आय.टी, मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या 'गणित ऑलींपियाड' परीक्षेमध्ये द्वितीय स्थान मिळाले असून ती रजद पदकाची मानकरी ठरली आहे. आमच्या सर्वांतर्फे तिचे हार्दिक अभिनंदन!

कु. अनुराग गांगल हा इ. ६ वी मध्ये शिकणारा आमचा विद्यार्थी "दि ग्रेटर बॉम्बे असोसिएशन्" तर्फे सन २००५-०६ मध्ये घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत रजत पदकाचा मानकरी ठरला आहे. आमच्या सर्वांतर्फे त्याचे मन:पूर्वक अभिनंदन!

## वि.प्र.मं. तंत्रनिकेतन

### ISTE ने आयोजित केलेले कार्यक्रम

दि. ७ फेब्रुवारी २००७ रोजी 'करीअर मार्गदर्शन' या विषयावर वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथील ISTE च्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. त्यात सौ. शर्मिला लोंढे यांनी या विषयावर व्याख्यान दिले. त्याकरिता तृतीय वर्षातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी ह्या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

दि. ७ फेब्रुवारी २००७ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात ISTE च्या विद्यार्थ्यांनी 'Thalessimia' या

रोगाविषयी मार्गदर्शन देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला. त्यासाठी डॉ. बोपार्डीकर (निवृत्त सर्जन) यांचे मोलाचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. १५ फेब्रुवारी २००७ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ह्या शिबीरात विद्यार्थी, व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. ह्या शिबिरात विद्यार्थ्यांना (रक्तदात्यांना) त्यांची 'Thalessimia' चाचणी मोफत करून देण्यात आली.

दि. १७ फेब्रुवारी २००७ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी प्रा. सौ. उषा राघवन (Ho IF Dept) यांनी विद्यार्थ्यांना Nano Technology विषयावर व्याख्यान दिले.

निरोप समारंभाची सांगता विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देवून करण्यात आली. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. त्यात ज्या विद्यार्थांनी राज्य पातळीवरील स्पर्धेत त्यात प्रोजेक्ट स्पर्धा, प्रदर्शन, पेपर सादरीकरण इत्यादी अशा स्पर्धेतील यशस्वितांना प्रमाणपत्र देण्यात आले.

दि. २४ फेब्रुवारी २००७ रोजी नेरळ येथील 'सगुणाबाग' येथे वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनातील प्राध्यापक कर्मचाऱ्यानी भेट दिली.

नेरळ येथील ही बाग उद्यान विद्येसाठी (Horticulturl)प्रसिद्ध आहे. येथे विविध प्रकारच्या दुर्मिळ स्वरूपाच्या माशांचे रोपण करण्यात आले आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी "EMU Farm" ला देखील भेट दिली. EMU हा आस्ट्रेलियाचा राष्ट्रीय पक्षी असून तो कशाप्रकारे आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे हे लक्षात आले.

वरील सर्व कार्यक्रम हे प्रा.सौ. जी.एस. इंगवले (ISTE चॅप्टर, सेक्रेटरी)यांनी आयोजित केले होते.

## राज्यस्तरीय प्रोजेक्ट प्रदर्शन व स्पर्धा

**SOFTEX - 2007**

**MSBTE State Level Project Competition / Exhibition SOFTEX - 07**



**मुख्य अतिथी मा.प्रा.जी सायगावी यांचे हस्ते प्रथम पारितोषिक स्वीकारताना बाबासाहेब गावडे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी चे विद्यार्थांसोबत वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य डी.के.नायक.**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनाने संगणक शाखेच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रितपणे राज्यस्तरीय प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा दि.२३ फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित केली होती.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, (MSBTE) विद्यार्थ्यांचे अंगभूत कौशल्य जोपासण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असते. MSBTE औद्यागिक बदलानुसार अभ्यासक्रमात सातत्याने बदल करीत आहे.

वि.प्र.मंडळाचे, तंत्रनिकेतन आतापर्यंत अनेक सेमिनार्स, कार्यशाळा, Short Term Courses, राष्ट्रीय

परिषदा, इत्यादी यशस्वीरीत्या आयोजित करीत आले आहे. वैज्ञानिक, तांत्रिक शैक्षणिक क्षेत्रातील ज्ञान तरुण पिढीला देण्याचे उद्दिष्ट तंत्रनिकेतनाने नेहमीच समोर ठेवले आहे.

ह्या प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना त्याच्यातील प्रतिभा व सृजनशीलता, तांत्रिक बाबी आत्मसात करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. प्रदर्शनात वेगवेगळ्या तंत्रनिकेतनातून एकुण २४ प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले होते. औद्यागिक क्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षकांकडून परीक्षण केले गेले. वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य डी.के.नायक यांच्यामते अशा प्रकारच्या प्रदर्शनातून प्रकल्पांची व्यावसायिक मूल्ये जोपासली जातात.

पारितोषक समारंभास मुख्य अतिथी म्हणून M.S.B.T.E चे मा. प्राध्यापक पी.जी.सायगावी उपस्थित होते. या प्रदर्शनात प्रथम पारितोषक बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजीच्या विद्यार्थ्यांना 'मोबाईल गेमींग' (Mobile gaming) या प्रकल्पासाठी मिळाले तर द्वितिय पारितोषक ठाकूर पॉलिटेक्नीकच्या विद्यार्थ्यांना Public Addressing Scheme upling FM Tech या प्रकल्पासाठी मिळाले. दोन उत्तेजनार्थ बक्षिसे MIT, सावित्रीबाई फुले पॉलिटेक्नीक व पार्श्वनाथ तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना मिळाली.

माहिती तंत्रज्ञान शाखेच्या विभाग प्रमुख प्रा. उषा राघवन यांच्यामते आजच्या पिढीत उत्तुंग क्षमता आहेत व त्यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न अशा माध्यमातून केला असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

## विद्युत अभियांत्रिकी विभाग

### 'Automation Engineering' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम

Automation Engineering या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम २८ फेब्रुवारी २००७ ते २ मार्च २००७ या काळात झाला. हा कार्यक्रम इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम्स व इन्स्ट्रुमेंटेशन विभागाने मिळून आयेजित केला. ह्या कार्यक्रमासाठी ''टेक्नोक्रॅट ॲकॅडमी ऑफ आटोमेशन ॲन्ड कंट्रोलर टेक्नॉलॉजी'' नाशिक येथील प्रशिक्षक आले होते. ह्या कार्यक्रमात वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनमधील EPS व Instrumentation विभागातील विद्यार्थी तसेच खोपोली तंत्रनिकेतन मधील विद्यार्थीही उपस्थित होते. ह्या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना ओटोमेशनचे महत्त्व व त्यातील माहिती देण्यात आली.




**डावीकडून - प्रो.डी.के.नायक (प्राचार्य) सौ. कात्रे (Taact), श्री. गायकवाड (Taact संस्थेतील प्रशिक्षक), सौ. वडेर (विद्युत विभाग प्रमुख) व सौ. जोशी (भाषण करताना)**

## विद्युत अभियांत्रिकी विभाग

### 'केबल्स व त्यांची जोडणी' यावर श्री खेर यांचे मार्गदर्शन

'केबल्स व त्यांची जोडणी' या विषयावर विद्युत अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २७ फेब्रुवारी २००७ रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री खेर, (अभियंता, टाटा पावर कंपनी लि.) यांनी विद्यार्थ्यांना पॉवर केबल्स, त्यात होणारे बिघाड व दुरुस्तीचे मार्ग ह्यावर मार्गदर्शन केले.



श्री खेर भाषण करताना.
(केबल्स व त्यांची जोडणी)

## विद्युत अभियांत्रिकी विभाग

विद्युत अभियांत्रिकी शाखेतील तृतीय वर्षाचे विद्यार्थी दरवर्षी विविध पेपर प्रेझेंटेशन व प्रोजेक्ट एक्सिबिशंस्मध्ये सहभागी होतात परंतु यावर्षी ही संधी द्वितिय वर्षाच्या विद्यार्थांनाही देण्यात आली. दोन्ही वर्षातील विद्यार्थांनी एकूण नऊ ते दहा स्पर्धांमध्ये भाग घेतला. त्यातील बहुतेक स्पर्धेत बरेचजण यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थांची नावे व स्पर्धांबद्दलचा तपशील:-

| स्पर्धा व आयोजक | विद्यार्थांचे नाव | विषय | मिळालेले बक्षीस |
|---|---|---|---|
| १) प्रयास ०६-०७ श्री.ना.दा ठाकरसी चे प्रेमलीला विठ्ठलदास तंत्रनिकेतन, मुंबई. | कु. कल्याणी ठेकेदार (तृतीय वर्ष) | सबस्टेशन ऑटोमेशन | प्रथम पारितोषिक रोख रकमेसहीत |
| २) स्पार्क -०७ के.के.वाघ तंत्रनिकेतन, नाशिक | कु. कल्याणी ठेकेदार सिस्टीम | स्काडा रोख रकमेसहीत | प्रथम पारितोषिक |
| ३) टेक्नो-इनोव्हा. ०७ भारती विद्यापीठ तंत्रनिकेतन, नाशिक. | कु. कल्याणी ठेकेदार | रिॲक्टीव | द्वितीय पारितोषिक |
| ४) प्रोव. ०६ पद्मभुषण वसंतदादा पाटील तंत्रनिकेतन सांगली | १) श्री. वरुण टिपणीस (तृतीय वर्ष) | अपारंपारिक उर्जा | प्रथम पारितोषिक (विभागून) |
| | २) श्री प्रशांत कुलकर्णी | नॅनोटेक्नॉलॉजी | तृतीय पारितोषिक |
| | ३) श्री मंगेश ढवळे (द्वितीय वर्ष) | व वॉटर फिल्ट्रेशन | |
| ५) स्पार्कल ०७ वेणूताई चव्हाण | १) वरुण टिपणीस | अपारंपारिक उर्जा | द्वितीय पारितोषिक |
| | २) श्री रसेल डिसूझा | नॅनोटेक्नोलॉजीचे | उत्तेजनार्थ पारितोषिक |

या शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेवून चमकदार कामगिरी केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे, स्पर्धा व आयोजक विषय व मिळविलेले पारितोषिक इत्यादिचा तपशील खालीलप्रमाणे:-

| स्पर्धा व आयोजक | विद्यार्थ्यांचे नाव | विषय | मिळालेले बक्षीस |
|---|---|---|---|
| १. प्रोजेक्ट प्रदर्शन स्पर्धा २००६-२००७ बाबासाहेब गावडे इस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई. | कु. अनुक्षी शेणॉय<br>कु. अमिषा मेस्त्री<br>कु. नेहा घाणेकर<br>कु सिद्धेश शेणॉय (सर्व तृतीय वर्ष) | Solar Powered automatic water Sprinkler using MicroProcessor | दुसरे पारितोषिक |
| २.Paper Presentation स्पर्धा २००६-२००७ बाबासाहेब गावडे इस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई. | कु. अनुक्षी शेणॉय (तृतीय वर्ष) | Cellular Telcom Systems | दुसरे पारितोषिक |
| ३.PaperPresentation स्पर्धा २००६-२००७ भारती विद्यापीठ, पुणे | कु. मानशी सचदे (तृतीय वर्ष) | SCADA Systems | प्रथम पारितोषिक |
| | कु. अनुक्षी शेणॉय (तृतीय वर्ष) | Broadband Communication | द्वितीय पारितोषिक |
| ४.PaperPresentation स्पर्धा २००६-२००७ सावित्रीबाई फुले तंत्रनिकेतन पुणे. | कु. मानशी सचदे (तृतीय वर्ष) | Embeded Systems | प्रथम पारितोषिक |

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डी.के. नायक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय, ठाणे

### नवोदित वकिलांची वादविवाद स्पर्धा.

दुसरी डॉ.वा.ना. बेडेकर स्मृती आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा दिनांक १६-२-२००७ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह ठाणे महाविद्यालय परीसरात संपन्न झाली.

वादविवाद स्पर्धेसाठी खालील विषय ठेवण्यात आले होते.

१) राष्ट्रपतींचा दयेचा अधिकार रद्द करावा.



श्री. सदाशिव देशमुख, रजिस्ट्रार (पर्सनल) मुंबई उच्च न्यायालय व नोव्हार्टिज इंडिया लि.चे श्री. तलवार हे वादविवाद स्पर्धेला परीक्षक म्हणून लाभले.

२) भारतीय राज्यघटनेतील भाग ४ (मार्गदर्शकतत्वांची) अंमलबजावणी करता आली पाहिजे.

३) भारतीय राज्यघटनेतील परिशिष्ट ९ रद्द करणे जरूर आहे.

श्री. सदाशिव देशमुख, रजिस्ट्रार (पर्सनल) मुंबई उच्च न्यायालय व नोव्हार्टिज इंडिया लि.चे श्री. तलवार हे वादविवाद स्पर्धेला परीक्षक म्हणून लाभले.

विधी महाविद्यालय, ठाणे यांनी प्रथम क्रमांकाचे रोख रु.३०००/- चे पारितोषिक पटकावले. द्वितीय क्रमांकाचे रु. २०००/- चे रोख पारितोषिक पाच वर्ष एसव्हिकेएम् विधी महाविद्यालय, विलेपार्ले यांच्याकडे गेले तर तृतीय क्रमांकाचे रोख रु.१०००/- चे पारितोषिक न्यू लॉ कॉलेज, माटुंगा यांनी पटकावले.

विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कु.राखी गोरक्षकर व कु. नैना पुत्रन यांनी अनुक्रमे रु.१५००/- व रु. ७५०/- चे उत्कृष्ठ वक्त्याचे प्रथम व तृतीय क्रमांकाचे रोख पारितोषिक पटकावले.

## मराठी दिवस - २२ फेब्रुवारी २००७



**मराठी दिन : प्रमुख पाहुण्या सौ. माधवी नाईक यांचा सत्कार करताना प्राध्यापिका सौ. जान्हवी नवरे.**

विधी महाविद्यालयाने मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी २००७ रोजी 'मराठी दिन' अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात, भरगच्च कार्यक्रम करून साजरा केला.

या दिवसाच्या निमिताने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, भित्तिपत्र स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा व वादविवाद स्पर्धाचे आयोजन केले होते.


माजीनगर सेविका अॅड.सौ.माधवी नाईक कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. जेष्ठ प्राध्यापिका सौ. जान्हवी नवरे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सांगितले की मराठी राज्यभाषेला योग्य तो न्याय मिळावा या एकाच उद्देशाने या दिवसाचे आयोजन केले आहे. नजिकच्या काळात ठाणे जिल्हा व सत्र न्यायालये तसेच कामगार न्यायालयांमध्ये पण न्यायदानाच्या कामकाजात राज्यभाषा मराठीला आदराचे स्थान मिळण्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत त्यासाठी वकिलांचे राज्यभाषेवर प्रभुत्व असण्याची नितांत गरज आहे असे त्यांनी सांगितले.

सौ. माधवी नाईक यांच्या उपस्थितीत वादविवाद स्पर्धेला सुरवात झाली परिक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले. सौ. माधवी नाईक यांनी बक्षिस विजेत्यांची नावे जाहीर केली. तसेच सभेमध्ये कसे बोलावे या संबंधातील मौलिक युक्त्या सांगितल्या. त्याबद्दल महाविद्यालय त्यांचे ऋणी आहे.

सौ. जान्हवी नवरे यांनी निबंध व घोषवाक्य स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम पाहिले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रवीन्द्र मनन : एक अंतर्मुख अनुभव!



७ ऑगस्ट! कविराज रवीन्द्रनाथ टागोरांची पुण्यतिथी! त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त दोनच क्षण जरी त्यांच्या आठवणीत गेले तरी ती आठवणही कित्येक दिवसांचा अमूल्य ठेवा ठरेल!

रवीन्द्रनाथ टागोरांचे रेखाचित्र काव्याचा गूढ विलक्षण शांतपणात अनुभव असतो. अगदी तसाच शांतपणाच्या समुद्रातला अनुभव टागोरांच्या चित्राकडे पाहिले की मनात भारावून जातो.

## गीतांजली

आज टागोरांची ३६ वी पुण्यतिथी. जन्माने भाषेने बंगाली असणारा हा महान ऋषितुल्य साहित्यिक भारतातील सर्वच लहानथोर साहित्यिकांचे मन भारावून टाकणारा अनुभव आहे. टागोरांचे नाव काढले की, नवसाहित्यिकही सहजपणे गीतांजली आठवतात. टागोरांच्या गीताजंलीला नोबेल पारितोषिक मिळणे ही कौतुकाची, अभिमानाची आणि वेगळी बाब! आपण नम्र होतो ते त्या गीतांजलीतील गूढ प्रार्थना आठवून. 'गीतांजली' हे खरेखुरे शांतपणाचे व ज्ञानाचे प्रतीक म्हणून जाणवते.

## न फिटणारे ऋण

१८६१ साली जन्म झालेल्या टागोरांनी १९१३ साली नोबेल पारितोषिक मिळविले. या गीतांजलीखेरीज त्यांच्या इतर कविता (मानसी, रूपाली वगैरे), कथा कादंबऱ्या देखील मनाला अशाच शांततेचा सखोल अनुभव देणाऱ्या आहेत. आयुष्याच्या शेवटी शेवटी चित्रकलेच्या माध्यमाचा त्यांनी केलेला आगळा उपयोग आणि रवीन्द्र संगीत देखील भारतीय मनाला टागोरांची केवढी मोठी देणगी आहे. या ऋणातून या जवमाता मुक्ती नाही.

### गीतांजलीतील एक कविता

### ।। संदेश ।।

*होय! मला ठाऊक आहे, हे सर्वच तुझं प्रेम आहे.*
*हे प्रियकर,*
*झाडांच्या पानापानातून हलणारं सोनेरी प्रकाश,*
*आकाश ओलांडून वाहणारे आळशी ढग,*
*आणि कपाळ स्पर्शाने सुखावणारा मंद वारा,*
*सर्वच हा पहाटप्रकाश डोळ्यातून ओतप्रोत आहे*
*माझ्या हाच संदेश आहे तुझा.*
*आकाशात कृपेने डोकावलेले तुझे डोळे*
*माझ्याकडे पहाताना,*
*माझे हृदय तुझ्या पायांना स्पर्श करतंय!*
*(माझं वंदन तू स्वीकार!)*

**अनुवाद - मोहन पाठक**

मुखपृष्ठावरून

संपादकीय

**शिक्षण - चिंता आणि चिंतन**

पारंपारिक विद्यापीठांचा इतिहास उगाळत बसण्यापेक्षा, स्वायत्त विद्यापीठाच्या कल्पनेचा पाठपुरावा करणे, पारंपारिक विद्यापीठांचे शिक्षणक्रम युद्ध पातळीवर बदलून व्यवसायाभिमुख करणे ही आजची गरज आहे. केवळ विद्यापीठाचा दर्जा नाही म्हणून समाजमान्यता नाही अशा, पण उत्तम काम करणाऱ्या कितीतरी चांगल्या संस्था आपल्या देशातही आहेत. आमचे श्रद्धास्थान असणारे कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांचे जीवनाभिमुख शिक्षणाबाबतचे विचार प्रेरक आहेत. त्यांच्यासारख्या, जमिनीवर पाय रोवून काम करणाऱ्या कितीतरी व्यक्ती आहेत, पण त्या निर्णयप्रक्रियेपासून दूर आहेत. अशा व्यक्तींचे विचार प्रत्यक्षात आणले, निर्णय घेऊन भविष्याचा विचार केला, तर शिक्षणक्षेत्रात आलेली साचलेपणाची अवस्था संपेल.

एकीकडे आयटी क्षेत्रात झेप घेणारे तरुण आहेत आणि दुसरीकडे कामात खो घालण्याची, निर्णय न घेण्याची मानसिकता असलेली रायकीय मंडळी आहेत. वास्तविक माहिती तंत्रज्ञानाचे उपयोजन प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. कार्यक्षम व मोठ्या संस्थांना स्वायत्तता दिली जाऊन नवनवीन व्यवसायांची ज्ञानक्षेत्रे उपयुक्त करण्याचे प्रयत्न हवेत. निरुपयोगी शिक्षण देणारी पद्धती बदलायची म्हणजे केवळ १०+ २ + ३, किंवा पदवीनंतर किती वर्षे इ. रचनेशी संबद्ध विचार नव्हेत, तर आशय कसा बदलला जाईल हे पहायला हवे.

अर्थात त्यासाठी शिक्षणाची दिशा व्यवसायाभिमुख करायला हवी, जीवनोन्मुख करायला हवी. नवीन काळातील नवीन व्यवसाय कोणते आहेत, त्यांच्या शिक्षणाची गरज कोठे आहे, कोठे नाही याचा विचार शिक्षणक्रम ठरवताना व्हायला हवा. विभागीय मंडळे झाली पण राज्यभर एकच शिक्षणक्रम आम्ही राबवित राहिलो तर, त्या त्या भागाची गरज जाणून तिला न्याय दिल्यासारखे कसे होईल? यात रचनेलाच महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता विचारात घेतल्या जात नाही.

क्षमताधिष्ठित शिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण यासंदर्भात विचारमंथन व्हावयास हवे. वास्तवाचे भान नसलेले तथाकथित समाजसुधारक, महापालिका, जिल्हापरिषदा, विद्यापीठाच्या विद्वत सभा अशा व्यासपीठांवर सर्वत्र मोफत शिक्षणाच्या गवगवा करीत टाळ्या मिळवतात. पण शिकू इच्छिणाऱ्यांनी यापुढे मोफत शिक्षण घेण्याचा हट्ट सोडायला हवा; तरच शिक्षणाचा जागतिकीकरणाच्या प्रवाहाच्या बरोबर आपण जाऊ शकू. अर्थात शिक्षणाची वास्तव किंमतही परवडू न शकणारा वर्ग आहे. त्यांची जबाबदारी शासनाने घेणे ठीक आहे. शिक्षण परवडणारा वर्गही 'फुकट' शिकायची स्वप्ने पाहील, तर काळाच्या मागे राहील.

आपण प्रवाहातून फेकले जायचे की प्रवाहाबरोबर जायचे हे आपण ठरवायचे आहे. त्यासाठी 'फुकट' चे आकर्षण सोडायला हवे!

दिशा
नियमित वाचा